सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३०७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### आत्महत्या प्रकरणात नवा ट्विस्ट

**गाझियाबाद :** गाझियाबादमधील एका घराच्या नवव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या करणाऱ्या तीन बहिणींच्या प्रकरणात पोलिसांना एक महत्त्वाचा धागा सापडला आहे. घटनेच्या सुमारे १५ दिवस आधी मुलींच्या वडिलांनी एका दुकानदाराला १५ हजार रुपयांना विकलेला मोबाईल फोन पोलिसांनी जप्त केला आहे. हा फोन दिल्लीच्या शालीमार गार्डन परिसरात सापडला.पोलिस उपायुक्त निमिश पाटील म्हणाले की, मोबाईल डेटा रिकव्हर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे आत्महत्येचा संबंध टास्क–आधारित ऑनलाइन कोरियन गेमशी आहे की नाही हे निश्चित होण्यास मदत होईल. कुटुंब आणि जवळच्या काही लोकांनी असा दावा केला की तिन्ही बहिणींना अशा गेमचे व्यसन होते.

### सासऱ्याकडून सुनेवर अत्याचार

**बंगळुरू :** नात्याला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. समाजात आदराचे स्थान असलेल्या एका प्रतिष्ठित पदावर काम करणाऱ्या महिलेला स्वत:च्याच घरात ज्या छळाचा सामना करावा लागला, ते ऐकून कोणाचेही मन विषण्ण होईल. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला हा भयानक प्रकार आता चव्हाट्यावर आला असून, यामुळे शिक्षण क्षेत्रातही मोठी खळबळ उडाली आहे.

### अजितदादांचा अपघात: विमान कंपनीबद्दल DGCA चा चक्रावून टाकणारा निर्णय

# रोहित पवारांचा संशय खरा?





**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १२ फेब्रुवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाला १५ दिवस झाले आहेत. २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊ वाजता अजित पवार यांचं विमान अपघातग्रस्त झालं. त्यावेळी अजित पवार मुंबईहून बारामतीला जात होते. अजित पवार यांच्या निधनानंतर व्हिए–सआर व्हेंचर्स कंपनीबद्दल शंका व्यक्त केल्या गेल्या. अजित पवार याच कंपनीच्या विमानातून प्रवास करत होते. अजित पवार यांचे पुतणे, आमदार रोहित पवार यांनी परवा पत्रकार परिषद घेत व्हिए–सआर कंपनीच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित केले.

अजित पवार व्हिएसआर कंपनीच्या मालकीच्या लियरजेट विमानातून प्रवास करत होते. या कंपनीची देखभाल दुरुस्ती, पायलट्सच्या शिफ्ट, विमानातून अवैधपणे सुरु असलेली पेट्रोल वाहतूक अशा अनेक गोष्टी रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मांडल्या. व्हिएसआर कंपनीच्या एका विमानाला २०२३ मध्ये मुंबई विमानतळावर अपघात झाला. त्या अपघाताचा चौकशी अहवाल अद्याप समोर आलेला नाही. या कंपनीवर ए–ड– या आंतरराष्ट्रीय संघटनेनं कारवाई केलेली आहे. मग ऊ्रछ– या कंपनीला पाठीशी का घालतेय, असा प्रश्न रोहित पवारांनी विचारला. आता याच कंपनीबद्दल धक्कादायक माहिती समोर आली आहे.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं (डीजीसीए) देशातील चार्टर कंपन्यांच्या विमानांचं स्पेशल ऑडिट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १४ प्रमुख कंपन्यांचं स्पेशल ऑडिट करण्यात येणार आहे. आश्चर्याची बाब म्हणजे यात अजित पवार यांनी प्रवास केलेल्या विमानाच्या कंपनीचं नाव नाही. त्यामुळे या कंपनीला वाचवण्यात येत आहे, अशी शंका उपस्थित केली जात आहे. व्हिए–सआर कंपनीत डीजीसीएचे अनेक माजी कर्मचारी काम करतात. त्यामुळे ही कंपनी अनेक पायदळी तुडवते, असा गंभीर आरोप रोहित पवार यांनी केला होता.

डीजीसीएकडून केल्या जाणाऱ्या स्पेशल ऑडिटमध्ये विमानांची काटेकोर तपासणी केली जाणार आहे. विमानाची देखभाल कशी आहे, इंजिन आणि तांत्रिक बाबी कशा पद्धतीनं ठेवण्यात आल्या आहेत, नियमित तांत्रिक तपासणी होत आहे का, या मुद्द्यांवर डीजीसीएचा भर असेल.

## तब्बल ७८ वर्षांनंतर पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता बदलणार



**दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या म्हणजेच शुक्रवार १३ फेब्रुवारी रोजी दुपारी पंतप्रधान कार्यालयचा (पीएमओ) पत्ता बदलणार आहेत. तब्बल ७८ वर्षांनंतर पीएमओचं ऑफिस स्थलांतरित करण्यात येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार साउथ ब्लॉकमधून 'सेवा तीर्थ' नावाच्या नवीन बांधलेल्या इमारतीत हे ऑफिस हलवण्यात येणार आहे. त्यापूर्वी पंतप्रधान मोदी साउथ ब्लॉकमध्ये झालेल्या शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. या बैठकीनंतर, केंद्रीय मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी रायसिना हिल–वरील एक किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर असलेल्या नवीन संकुलात जातील.

मिळालेल्या माहितीनुसार; मागील ५ दशकांपासून सरकारच्या सर्व महत्त्वाच्या निर्णयाचं केंद्र राहिलेले साऊथ ब्लॉकमधील पंतप्रधानांचे कार्यालय आता ब्रिटीश कालीन इमारतीतून नव्या सेवा तीर्थ येथे शिफ्ट होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी साऊथ ब्लॉकमध्ये होणाऱ्या कार्यालयात अखेरची कॅबिनेट बैठक घेतील. त्यानंतर नव्या प्रशासकीय भवनाचे उद्घाटन करण्यात येईल. रायसीना हिलजवळ नवी प्रशस्त इमारत साऊथ ब्लॉकपासून काहीच अंतरावर आहे.

या कॅबिनेट बैठकीनंतर केंद्रीय मंत्री आणि अधिकाऱ्यांसोबत पंतप्रधान साऊथ ब्लॉकपासून सेवा तीर्थला जातील. जिथे पंतप्रधान कार्यालय, कॅबिनेट सचिवालय, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांचे कार्यालय आणि इंडिया हाऊस आहे. इंडिया हाऊसमध्ये उच्चस्तरीय शिष्टमंडळाचा पाहुणचार करण्यासाठी बनवलेले नवीन ठिकाण आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वात पहिली कॅबिनेट बैठक साऊथ ब्लॉकमध्येच झाली होती.

# धनंजय मुंडेंच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास मोठे यश

## ऊसतोड कामगारांच्या मुला – मुलींना दर्जेदार शिक्षणाची वाट मोकळी



**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १२ फेब्रुवारी :** लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेला व्यापक स्वरूप प्राप्त होत असून धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.

धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना २५ जून, २०२१ रोजी या योजनेची घोषणा करून प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली होती. त्यामुळे मुंडे जनक असलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये शंभर क्षमतेचे मुलींसाठी एक व मुलांसाठी एक असे एकूण २२ वसतीगृह मंजूर करून भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेले आहेत. दरम्यान त्यापैकी आतापर्यंत तीन वसतीगृहांना स्वतःची जागा व निधी मिळालेला असून त्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून, उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी जागेसह १५९ कोटी छत्तीस लाख रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आला आहे.

ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातात भविष्यात कोयत्याच्या ऐवजी वही, पुस्तक आणि पेन यावेत असे स्वप्न उराशी बाळगून धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेची घोषणा करत सुरुवात केली होती. त्या अंतर्गत ऊसतोड कामगारांची सर्वाधिक संख्या असलेल्या राज्यातील ४१ तालुक्यांमध्ये ८२ वसतीग्रह सुरू करण्याची घोषणा धनंजय मुंडे यांनी करून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे २२ वसतीग्रहे भाड्याच्या जागेत सुरू केली होती.

दरम्यान यापैकी तीन वसतीगृहे ही स्वतः च्या जागेमध्ये उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून आता आणखी उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये परळी सह पाटोदा, गेवराई, केज, माजलगाव या तालुक्यातील प्रत्येकी दोन तर बीड तालुक्यातील एक वसतिगृह उभारले जाणार आहे. तर प्रयत्न वसतिगृह उभारणीसाठी सुमारे १४ कोटी ५५ लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.

## घराच्या ड्रेनेज लाइनच्या कामासाठी आलेल्या व्यक्तीने तब्बल ७ कोटी लुटले

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ फेब्रुवारी :** सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांसह पोलिसही चक्रावून गेले असताना ड्रेनेजलाइन दुरुस्तीच्या नावाखाली एका सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्याला सहा कोटी ७० लाख रुपयांना गंडा घालण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात ६१ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली असून, संदीप चव्हाण, आदित्य चव्हाण, जितेन सोळंकी, शर्मा, राउत, महाजन तसेच बँक मॅनेजर व न्यायाधीश असल्याची बतावणी करणाऱ्या अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार हे सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून अतिरिक्त संचालक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या आईच्या नावे पुण्यातील नवी पेठेत भाड्याने दिलेले घर आहे. भाडेकरूने ड्रेनेज तपासणीसाठी आलेल्या एका व्यक्तीशी बोलण्यास सांगितल्यानंतर, संदीप चव्हाण नावाच्या व्यक्तीने आपण महापालिकेचा अधिकारी असल्याची बतावणी करून स्वतंत्र ड्रेनेजलाइन टाकण्याचा प्रस्ताव दिला. प्रारंभी ६५ हजार रुपये खर्च सांगून तक्रारदारांकडून ऑनलाइन रक्कम घेतली. त्यानंतर जून २०२५ पर्यंत तक्रारदारांकडून एकूण तब्बल सहा कोटी ७० लाख ३७ हजार ५०० रुपये उकळण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.




## कला प्रदर्शनाचे आयोजन

**मुंबई:** कला संचालनालयामार्फत आयोजित '६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग)' यंदा सांगली येथे आयोजित करण्यात येत असून, दि. १६ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कलाविश्र्व महाविद्यालय, शांतिनिकेतन आवार येथे हे प्रदर्शन पार पडणार आहे. शालेय विद्यार्थ्यांचा विशेष गौरव हे यंदाच्या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यातील शासकीय व खासगी कला संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळावे या उद्देशाने हे प्रदर्शन दरवर्षी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आयोजित केले जाते. यंदा राज्यभरातून ३ हजार ,४९० विद्यार्थ्यांच्या एकूण ५ हजार ६८० कलाकृती प्राप्त झाल्या असून, त्यापैकी निवड समितीने १,२७५ उत्कृष्ट कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड केली आहे.

# तुम्हाला भारतात यावेच लागेल, ही तुमची शेवटची संधी

## उच्च न्यायालयाने विजय मल्ल्याला बजावले



**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १२ फेब्रुवारी :** मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी (१२ फेब्रुवारी) फरार उद्योगपती विजय मल्ल्या यांच्याविरुद्ध कडक टिप्पणी केली आणि म्हटले की, जर तो भारतात परतला तरच त्याची याचिका ऐकली जाईल. न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, मल्ल्या भारतीय न्यायालयातून दिलासा मागत असताना कायदेशीर प्रक्रियेपासून वाचू शकत नाही. तुम्हाला परत यावे लागेल. जर तुम्ही परत येऊ शकत नसाल, तर आम्ही ही याचिका ऐकू शकत नाही, असे उच्च न्यायालयाने मल्ल्याला सांगितले आणि हे स्पष्ट केले की हे प्रकरण पुढे जाण्यासाठी त्याचे भारतात परत येणे ही एक पूर्वअट आहे.

न्यायालयाने पुढे म्हटले की; मल्ल्या कायदेशीर प्रक्रियेला टाळत आहेत आणि देशाबाहेर राहून याचिका दाखल करण्याचा फायदा घेऊ शकत नाहीत. न्यायालयासमोरील याचिका फरार आर्थिक गुन्हेगार (ऋएज) कायद्याच्या तरतुदींना आव्हान देते. मल्ल्या स्वतःला भारतीय अधिकारक्षेत्रात सादर करत नाही तोपर्यंत ते याचिकेवर विचार करणार नाही असे उच्च न्यायालयाने सूचित केले.

२०१६ पासून युकेमध्ये वास्तव्य करणाऱ्या विजय मल्ल्याने मुंबई उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल केल्या आहेत, त्यापैकी एक त्यांना फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याच्या आदेशाला आव्हान देणारी आहे आणि दुसरी फरार आर्थिक गुन्हेगार (ऋएज) कायदा, २०१८ च्या घटनात्मक वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. ७० वर्षीय मद्यसम्राटावर भारतात फसवणूक आणि मनी लॉँड्रिंगशी संबंधित अनेक खटले दाखल आहेत.

१८ फेब्रुवारी रोजी पुढील सुनावणीसाठी खंडपीठाने सांगितले की, मल्ल्याला भारतात परतण्यास इच्छुक आहे की नाही हे स्पष्ट करण्यासाठी ते आणखी एक संधी देत आहेत. तुम्ही न्यायालयाच्या प्रक्रियेला टाळाटाळ करत आहात हे आम्हाला नोंदवावे लागू शकते. तुम्ही कार्यवाहीचा फायदा घेऊ शकत नाही. तुमच्याशी पूर्णपणे निष्पक्ष राहून, आम्ही याचिका फेटाळत नाही आहोत तर तुम्हाला आणखी एक संधी देत आहोत, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या मागील सुनावणीदरम्यान, खंडपीठाने आधीच सूचित केले होते की जर मल्ल्या भारतात परतले तरच ते याचिकेवर सुनावणी करतील आणि त्यांच्या वकिलांनाही ते स्पष्ट करण्यास सांगितले होते.

गुरुवारी, खंडपीठाने मल्ल्या यांना परत येण्याचा त्यांचा हेतू आहे की नाही हे स्पष्टपणे सांगणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. तुम्ही कधी येणार आहात? तुम्ही (मल्ल्या) आधीच असा युक्तिवाद केला आहे की तुम्हाला न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय सुनावणीचा अधिकार आहे. पण प्रथम ते स्पष्टपणे सांगणारे प्रतिज्ञापत्र दाखल करा, असे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर म्हणाले.

मल्ल्याचे वकील अमित देसाई यांनी असा युक्तिवाद केला की न्यायालयीन उदाहरणे याचिकाकर्त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय अशा याचिकांवर सुनावणी करण्याची परवानगी देतात.या याचिकेला विरोध करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी असा युक्तिवाद केला की मल्ल्याने फरार घोषित झाल्यानंतरच एफईओ कायद्यातील तरतुदींना आव्हान दिले होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थोडक्यात...

## फर्मान हैदर आणि सोनाक्षी बत्रा यांनी चाहत्यांचे मानले आभार

**छत्रपती संभाजीनगर :** Zee TV वरील लोकप्रिय 'जगद्धात्री' मालिकेतील शिवाय (फर्मान हैदर) आणि जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) ही ऑनस्क्रीन जोडी "Shivdhatri' नावाने सोशल मीडियावर जोरदार ट्रेंड होत असून प्रेक्षक एंगेजमेंट लक्षणीय वाढले आहे. मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल दोन्ही कलाकारांनी चाहत्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सोनाक्षीने सहकलाकार फर्मानच्या सपोर्टिव्ह वर्क डायनॅमिक्सचे कौतुक केले, तर फर्मानने प्रेक्षकांच्या पाठिंब्यामुळे परफॉर्मन्स डिलिव्हरीला ऊर्जा मिळत असल्याचे सांगितले. सध्या कथानकात खोट्या लग्नामागील रहस्य उलगडण्याची हाय-इंटेन्सिटी ट्रॅक सुरू असून पुढील एपिसोड्सबाबत व्ह्यूअर क्युरिऑसिटी शिखरावर पोहोचली आहे.

## नायकाचे हृदय: देवच्या भावनिक क्षणांना अभिषेक शर्माची प्रभावी छटा

**छत्रपती संभाजीनगर :** Zee TV वरील 'वसुधा' मालिकेत देवची भूमिका साकारणारा अभिषेक शर्मा संवेदनशील नायकाची नवी प्रतिमा उभी करत आहे. पारंपरिक कठोर नायकांपेक्षा देवची व्यक्तिरेखा भावनिक, अंतर्मुख आणि मानवी पैलूंनी समृद्ध आहे. चंद्रिकाशी दुरावा आल्यावर आईशी संवाद साधण्याचा प्रसंग साकारताना स्वतः भावुक झाल्याचे अभिषेकने सांगितले. देहबोली, शांतता आणि संयत हावभावांतून तो देवचे आंतरिक संघर्ष प्रभावीपणे मांडतो. कुटुंब, जबाबदाऱ्या आणि नैतिक पेचांमुळे देव-वसुधाच्या नात्यात ताण वाढला असून पुढील भागांविषयी उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मालिका दररोज रात्री ९:३० वाजता Zee TV वर प्रसारित होते.

## केशरी रंगाचा पॅक टाटा सॉल्टचाच नसतो

**मुंबई :** भारतातील आयोडाइज्ड मीठ विभागात १९८३ पासून अग्रणी आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड असलेल्या टाटा सॉल्टतर्फे 'हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता' हा ठाम संदेश देत, बनावट मीठ पॅकविरोधात लढ्याचे नेतृत्व करण्यात येत आहे. विशेषतः महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेल्या असंघटित मीठ बाजारपेठेत आणि बनावट मीठ पॅकच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्र्वभूमीवर शुद्धता व विश्र्वासाचे नवे मापदंड प्रस्थापित करत, ही जाहीर घोषणा टाटा सॉल्टच्या उत्कृष्ट दर्जाचे मीठ पुरवण्याच्या ठाम वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

## जागतिक डाळ दिन साजरा

**मुंबई :** भारतीय कुटुंबांची पोषण सुरक्षा, मातीचे आरोग्य आणि ग्रामीण उपजीविकेत डाळींची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, हवामान परिस्थिती, विखुरलेली जमीन, कीटक आणि रोगांचे सततचे त्रास आणि दर्जेदार बियाण्यांची मर्यादित उपलब्धता यामुळे डाळी उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादकतेच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते आहे. यासाठी मुळापासून मजबूत पाठिंब्याची गरज अधोरेखित होते. या आव्हानांना तोंड देण्यासाठी गोदरेज अॅग्रोव्हेट लिमिटेडच्या पीक संरक्षण व्यवसायाने जागतिक डाळी दिनानिमित्त पाच लाखांहून अधिक डाळी उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवत शेतकरी संपर्क उपक्रम हाती घेतला. चांगल्या कृषी पद्धतींच्या (जीएपी) आधारे नियोजनबद्ध प्रशिक्षण कार्यक्रम या उपक्रमात आयोजित केले गेले, ज्यात दीर्घकालीन डाळींच्या लागवडीला पाठिंबा देण्यासाठी माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले.

## नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांचा काळे परिवाराकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १२ फेब्रुवारी :** आमखेडा गटातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांचा काळे कुटुंबाच्या वतीने नुकताच शाल व फुलगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रकाश दादा काळे,पूजा दीदी जाधव,रवींद्र काळे,सुनील काळे,सुधीर पठाडे,कैलास काळे,छाया काळे,शीला काळे,शोभा काळे,कमलेश काळे,अनुराधा पठाडे,किरण काळे,पुनम काळे,गौरव काळे आदी उपस्थित होते.

## हतनूर येथे शेतात गळफास घेऊन शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. १२ फेब्रुवारी :** तालुक्यातील हतनूर येथे शेतात गळफास घेऊन शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना बुधवार दि.११ रोजी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

संतोष दशरथ पंडित (वय ४४, रा. हतनूर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.मयत संतोष पंडित यांनी त्यांच्या शेताच्या शेजारी असलेल्या गोरख



वीर यांच्या शेताच्या बांधावरील लिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीच्या साहाय्याने दुपारी ३ वाजेच्या सुमारास गळफास घेतला. काही वेळानंतर ही घटना लक्षात आल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

घटनास्थळी पोलीस दाखल झाले असता संतोष पंडित यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, हतनूर येथे नेण्यात आला. येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप कांबळे यांनी शवविच्छेदन केले.

या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास डॉ. रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कैलास करवंदे हे करीत आहेत. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून विविध बाजूंनी तपास सुरू आहे.संतोष पंडित यांच्या पश्र्चात पत्नी,एक मुलगी दोन मुले असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पंडित कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

# तासिका तत्वावरील प्राध्यापकांना दरमहा सव्वा लाख रुपये मानधन द्या

## सीएचबी संघर्ष समितीची मागणी; लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ फेब्रुवारी :** राज्यातील १२ विद्यापीठे आणि सुमारे ११०० महाविद्यालयांमध्ये ९० टक्के अध्यापनाची बाजू तासिका तत्वावरील प्राध्यापक वेठबिगारीप्रमाणे करीत आहेत. त्यामुळे नव्या समान काम समान वेतन कायद्यानुसार अध्यापनाचे कार्य करणार्या तासिका तत्वावरील प्राध्यापकांची दरवर्षी ११ महिन्यांसाठीी नियुक्ती करून त्यांना दरमहा १ लाख २५ हजार रुपये मानधन देण्यात यावे अशी मागणी सीएचबी संघर्ष समितीने राज्य सरकारकडे केली आहे.

संपूर्ण जगाला न्याय, समता, बंधूता या तत्वांची शिकवण देणार्या फुले, शाहू, आंबेडकरांच्या राज्यात १९८३-८४ म्हणजे तब्बल ४९ वर्षांपासून उच्चशिक्षित तरूणांना शैक्षणिक वेठबिगार म्हणून वापरले जात आहे. अनेक ठिकाणी तर तासिका तत्वावरील ग्रामीण भागातील प्राध्यापकांना वर्षभर मानधनही दिले जात नाही. त्यामुळे त्यांना उपाशीपोटी राहून अध्यापनकार्य करावे लागते.

तसेच पंधरा ते वीस वर्षांपासून एकाच महाविद्यालयात काम करणार्या सीएचबी प्राध्यापकांना दरवर्षी मुलाखतीला बोलावले जाते हा त्यांच्या शिक्षणाचा घोर अपमान केला जातो. दिवाळी, परीक्षेच्या काळातील मानधन दिले जात नाही. आठवड्याला ९ तासिका दिलया जातात. त्यातही ९०० व ७५० असे वर्गीकरण करून आर्थिक पिळवणूक कशी करता येईल याची काळजी सरकारने घेतली आहे. त्यातही महाविद्यालयात तासिका घेतल्यानंतर सहा तास महाविद्यालयात थांबण्याची सक्ती केली जाते. महाविद्यालयातील लिपिकवर्गाची कामे तासिका तत्वावरील प्राध्यापकांकडून करून घेतली जातात. ही शैक्षणिक वेठबिगारीच आहे.

कायमस्वरूपी प्राध्यापकांच्या बरोबरीने किंबहुना त्यांच्याहीपेक्षा जास्त काम करणार्या सीएचबी प्राध्यापकांची होणारी ही पिळवणूक थांबवून, नव्या कामगार कायद्यानुसार 'समान काम समान वेतन' या न्यायाने सीएचबी प्राध्यापकांना दरमहा किमान १ लाख २५ हजार रूपये वेतन देण्यात यावे. तसेच खालील मागण्या मान्य करून सीएचबी प्राध्यापकांना न्याय देण्याची मागणी समितीने केली आहे.

समितीने केलेल्या निवेदनात ३१ मार्च ते १ जुलै या काळात तासिका तत्वावरील प्राध्यापकांना काम नसल्याने उपासमारीची वेळ येते. त्यामुळे दरवर्षी ११ महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात यावी. तासिका तत्वावरील प्राध्यापकांना आठवड्याचा ९ तासिकांचा वर्कलोड वाढवून मानधन अथवा वेतन दरमहा १,२५,००० करावे. महिन्याच्या पाचव्या आठवड्याच्या तासिकांचे मानधन वाढवून द्यावे. महागाई निर्देशांकानुसार तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्यात यावी. राज्यात जवळपास १५ हजारांपेक्षा जास्त प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत.




त्या जागांवर १० वर्षांपेक्षा जास्त काळ काम करणार्या तासिका तत्वावरील प्राध्यापकांना कायमस्वरूपी नियुक्ती द्यावी. तासिका तत्वावरील प्राध्यापक भरती पद्धत म्हणजे शैक्षणिक वेठबिगारी आहे. ती बंद करून राज्यातील प्राध्यापकांच्या रिक्त जागा एकदाच भरण्यात याव्यात. नवीन शैक्षणिक धोरणाच्या नावाखाली शिक्षणाचे खच्चीकरण, खासगीकरण आणि बाजारीकरण थांबवावे. तासिका तत्वावरील प्राध्यापक भरती अधिसुचनेनुसार येत्या शैक्षणिक वर्षात १५ जूनपासून तासिका तत्वावरील प्राध्यापकाचे अध्यापनकार्य सुरू होईल याचे काटेकोर पालन करण्याची सूचना विद्यापीठे व महाविद्यालयांना देण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

समितीच्या वरील मागण्या मान्य करून तासिका तत्वावरील प्राध्यापकांना न्याय द्यावा. या मागण्या मान्य न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छोडण्यात येईल. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील याची नोद घ्यावी असा इशराही देण्यात आला आहे. या मागण्यांचे निवेदन सरकारला देण्यात येणार असून, निवेदनावर समितीचे अध्यक्ष प्रा. पंजाबराव मोरे यांच्यासह तासिका तत्वावरील शेकडो प्राध्यापकांच्या सह्या आहेत.

## मामाचे हरवलेले पत्र,स.भु.च्या विद्यार्थ्यांना सापडले

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. १२ फेब्रुवारी :** पूर्वीच्या काळी एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, ख्यालीखुशाली जाणून घेण्यासाठी पत्र हे एकमेव साधन होते.काही तरी आनंदाची बातमी ऐकण्यासाठी कान आणि डोळे पोस्टमन कधी गावात येईल आणि कधी आनंदाची बातमी मिळेल याची आतुरतेने वाट पाहत असे.परंतु काळाच्या ओघात पत्र हा प्रकार लोप पावत गेला आणि पत्राची संवाद साधण्याची जागा विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईलने घेतली.आज या तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात जगभरातील कुठल्याही व्यक्तीशी क्षणात संपर्क होतो त्यामुळे पत्रलेखन हा प्रकार जवळजवळ संपुष्टात आला. परंतु पत्राची जागा मोबाईल कधीच घेऊ शकत नाही.जो ओलावा, प्रेम पत्रलेखनामध्ये आहे, तो मोबाईल, व्हॉट्स अप वरील



संवादात नाही. लहानपणी मुलं माझ्या मामाचे पत्र हरवले..

ते आम्हाला नाही सापडले हा खेळ आवडीने खेळायचे पण आज खरचं हे मामाचे पत्र हरवले आणि हरवलेले हे पत्र शोधण्यासाठी पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीनचे विद्यार्थी चक्क बिडकीनच्या पोस्ट खात्याच्या कार्यालयात पोहचले व तेथील पोस्टमन काकांच्या मदतीने शोधून काढले.इयत्ता सहावीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकात वडिलांस पत्र नावाचे एक प्रकरण विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आहे. इयत्ता बारावीपर्यंत जवळजवळ सर्वच विद्यार्थ्यांना पत्रलेखन हा प्रकार आहे. परंतु तो केवळ गुण मिळवण्यापुरताच मर्यादित न रहाता विद्यार्थ्यांना पत्र व पत्राचे प्रकार,कुरीअर सुविधा,स्पिड पोस्ट, पोस्टाच्या सुकन्या योजना, आवर्ती ठेव योजना, पीपीएफ,पोस्टाचे विविध उपक्रम, योजना, पत्रव्यवहार इत्यादीची सविस्तर माहिती व्हावी या उद्देशाने प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विषयाचे शिक्षक ज्ञानेश्र्वर चाटुपळे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी पोस्ट ऑफिसला भेट दिली. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात आपल्या लाडक्या मामाला लिहिलेले भावनिक पत्र तेथील पत्रपेटीत टाकले व तेथील सर्व कामकाजाची माहिती घेतली.यावेळी सब पोस्ट मास्टर रेखा बक्षी,सुषमा देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पोस्टाच्या सुकन्या योजना, आवर्ती ठेव योजना,पीपीएफ व पोस्टाचे व्यवहार याविषयी सविस्तर माहिती दिली.पोस्ट कार्यातील अमोल घुले,गोरख धर्मे, प्रदिप जगधने, कृष्णा मोटे यांनी सहकार्य केले.

## पंचायत समितीच्या, निवडणुकीत भाजपाच्या आमदार प्रशांत बंब यांच्या एक हाती सत्तेला मतदारांनी नाकारले

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. १२ फेब्रुवारी :** खुलताबाद पंचायत समिती निवडणुकीत भाजपा च्या एक हाती सत्तेला मतदार राजाने अखेर सुरुंग लावत आ. जिल्हाध्यक्ष सतीश चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाला. २ तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट. १ जागेवर विजय मिळाल्याने भाजपाला बहुमतापासून दूर ठेवण्यात यश मिळाले आहे.

मागील पंचायत समिती निवडणुकीत आमदार प्रशांत, बंब यांच्या नेतृत्वाखाली सहापैकी. भाजप ४. काँग्रेस १. अपक्ष १ जागेवर विजय मिळवला होता. जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपा, ३ जागेवर दणदणीत विजय मिळवला होता. परंतु तालुक्यातील आमदार प्रशांत बंब यांच्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या



नियोजनात जिल्हा परिषद उमेदवारीवरून भाजपाच्या एका गटात प्रचंड रोष होता . त्यामुळे आमदार बंब यांनी पंचायत समिती साठी दिलेले उमेदवार निवडून आणण्यात अपयश आल्याची चर्चा खुलताबाद तालुक्यात होतानी दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट. व शिवसेना उद्धव ठाकरे गट. यांनी आपली ताकद दाखवून खुलताबाद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाला एक हाती सत्तेपासून दूर ठेवण्यात यश मिळवले आहे.

## गुरुकुल स्कूलमध्ये १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १२ फेब्रुवारी :** गुरुकुल इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पैठण येथे शाळेच्या प्रांगणात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला संस्थेच्या आधारस्तंभ सौ. शशिकला लखमले, संचालिका सौ. नयना लखमले, संचालिका सौ. सारिका लखमले, अदित लखमले, प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ. सुनीता पाठक तसेच संस्थेच्या अध्यक्षा सौ. अश्र्विनी लखमले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी शाळेचे सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी आरती चोरमारे, जोयबा शेख, रामकन्या बनगर, दीपिका शी तसेच विद्यार्थी सागर शिंदे यांनी आपल्या शालेय आठवणी सांगून भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्र सूत्रसंचालन विद्यार्थिनी तेजश्री भोसले व कार्तिकी भोसले यांनी केले.

यावेळी शितल खरात, वैशाली बोरूडे, रंजना गायकवाड, विशाखा गंगावणे, कार्तिकी रोडगे, कांचन बनसोडे, मुबशेरा शेख, गायत्री देशमुख, भक्ती मुंदडा, राणी काकडे, सपना पोपळघट, सोमेश फतपुरे, भागवत बनसोडे आदी शिक्षक उपस्थित होते.

## वंदना देविदास काकडे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ फेब्रुवारी :** रमाबाई आंबेडकर चौक भावसिंगपुरा येथील रहिवासी वंदना देविदास काकडे (४५) यांचे आज दि.१२ फेब्रुवारी रोजी सकाळी ४ वाजून ३० मिनिटांनी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भावसिंगपुरा येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात पती, दोन मुले असा परिवार आहे. दैनिक भास्करचे कर्मचारी देविदास काकडे यांच्या पत्नी होत.

## डॉ. अरुण मरवाळे यांची 'आयएपीपी'च्या अखिल भारतीय सचिवपदी निवड

### राष्ट्रीय स्तरावर निवड होणारे मराठवाड्यातील पहिले डॉक्टर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ फेब्रुवारी :** इंडियन सायकियाट्रिक सोसायटी (आयपीएस) आणि इंडियन असोसिएशन ऑफ प्रायव्हेट सायकियाट्रिक (आयएपीपी) यांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. अरुण मरवाळे यांची दोन्ही संघटनांच्या अखिल भारतीय मानद सचिवपदी निवड झाली आहे.



इंडियन सायकियाट्रिक सोसायटी ही भारतातील मनोविकारतज्ज्ञांची सर्वात मोठी राष्ट्रीय संघटना मानली जाते तर इंडियन असोसिएशन ऑफ प्रायव्हेट सायकियाट्रिक ही खाजगी क्षेत्रात कार्यरत मनोविकारतज्ज्ञ डॉक्टरांची प्रमुख संघटना आहे. विशेष बाब म्हणजे, या दोन्ही राष्ट्रीय स्तरावरील मानाच्या पदांवर निवड होणारे डॉ. अरुण मरवाळे हे मराठवाडा विभागातील पहिले डॉक्टर ठरले असून ही संधी छत्रपती संभाजीनगरला प्रथमच प्राप्त झाली आहे. या निवडीसाठी डॉ. अरुण मरवाळे यांना इंडियन सायकियाट्रिक सोसायटी छत्रपती संभाजीनगर शाखेच्या सर्व सदस्यांचे भक्कम पाठबळ लाभले. विशेषतः डॉ. विनय बारळे, डॉ. अजीज कादरी, डॉ. संजीव सावजी तसेच स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ. माणिक भिसे व इतर सर्व सदस्यांचे सहकार्य मोलाचे ठरले आहे.

सदर पदभार पुढील दोन वर्षांसाठी राहणार असून या कालावधीत रुग्ण व डॉक्टरांच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याचा मानस डॉ. मरवाळे यांनी व्यक्त केला आहे. तसेच मेंटल हेल्थ केअर अॅक्ट २०१७ च्या चौकटीत राहून शासन, रुग्ण आणि वैद्यकीय व्यावसायिक यांच्यात समन्वय साधण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी माहिती त्यांनी दिली.

# रानमेवा बिब्ब्या फळामुळे अनेकांना रोजगाराची आशा!

## औषधी म्हणून ओळखली जाणारी बिब्ब्याची झाडे बहरले !

**तभा वृत्तसेवा/उल्हास शेजवळ**

**अजिंठा, दि. १२ फेब्रुवारी :** रानमेवा म्हणून प्रसिद्ध असलेल्या बिबा फळाला यंदा जोरदार बहार लागला आहे गेल्या तीन - चार वर्षांच्या दुष्काळी स्थितीची कसर यंदा परतीच्या पावसाने भरून काढली. त्यामुळे चार वर्षांनंतर रानमेवा असलेल्या बिब्याच्या झाडाला मोठा बहर आला आहे. बिब्याची तोडणी करत गोडमबीची विक्री करून त्यावर उपजीविका भागवणाऱ्या सिल्लोड तालुक्यातील अजिंठा, अनाड, मुकपाट, बाळापूर, सराटी, बोदवड, खंडाळा, पिंपळदरी, वसई, जळकी, उडणगांव, अंभई, हळदा, डकला, डिग्रस, पानस, धोत्रा गोळेगांव अमसरी वाघेरा आदी ग्रामिण क्षेत्रातील डोंगराळ भागातील मजुरांना त्यामुळे रोजगाराची आशा निर्माण झाली आहे.

अजिंठा परिसरातील शेत शिवारातील बांधावर व डोंगर परिसरात बिबाचे झाडी सध्या दिसून येत आहे.



पूर्वी ग्रामिण भागातील प्रत्येक घरात अढळणारा हा औषधी गुणधर्म असलेला विब्या घडा - मडक्यात हमखास पाहायला मिळत असे, आजीबाईच्या बटव्यात तर याला मानाचे स्थान होते. असा हा बिब्बा अलीकडच्या काळात बऱ्यांच जणाच्या खिजगणतीतही नसावा, याचे आश्र्चर्य वाटण्यासारखे आहे .मकर संक्रांतिला पूजासाठी बिब्बा महत्वपूर्ण असते. जंगल संपती असल्याने डोंगर दरीत राहणारे आदिवासी किवा स्थानिक लोकांना या बिब्बे चे फळेमुळे चार पैशाचा आधार मिळते. साधारण बिब्ब्याची फळे हे दिवाळी झाले की, पिकायाला सुरुवात होते. काजूसारखी येणारी पिवळसर केशरी बोर्डे असलेल्या फळ बिब्बे तोडून काळसर रंगाची बिब्बे काढून त्यांना ऊनात सुकवून त्याना जवळपासच्या आठवडी बाजारात किंवा शहरात विक्री केली जाते. बिब्बा हा चवीला तुरट आणि रूचक असणारे हे फळ पिष्टमय असते. कच्चे पिवळसर रंगाची फळ खाले तर घशात अडकल्या सारखे होते. त्यामुळे पिकल्यानंतर खाण्यास योग्य असते.

शेतकऱ्यांचे आणि बिब्ब्याचे जवळचे नाते आहे. पूर्वीच्या काळी बिब्बा जनावरांना एखाद्याची नजर लागू नये, म्हणून बैलाच्या गळ्यात बिब्बेतसेच गाई म्हैस शेळीच्या गळ्यात माळ बिब्याचे, पायात काटा घुसला तर बिब्याचे तेलचा चटका द्यायचा.पावसाळ्यात पायाला चिखल्या पडल्या पडल्या, भेगा पडल्या तर बिब्बे घालने हा उपाय होता.अजूनही ग्रामीण भागात बिब्याचा वापर जुनी मंडळी करत असल्याचे पाहावयास मिळते.

### बिबा फळाला यंदा जोरदार बहरले

रानमेवा म्हणून प्रसिद्ध असलेल्या बिबा फळाला यंदा जोरदार बहार लागला आहे. आर्युवेदात बिब्याचे अनेक महत्वाचे अनेक गुणधर्म सांगितले आहेत. गेल्या चार वर्षांच्या दुष्काळी स्थितीची कसर यंदा परतीच्या पावसाने भरून काढली. पाच वर्षांनंतर यंदा रानमेवा असलेल्या बिब्याच्या झाडाला मोठा बहर आलाय. बिब्याची तोडणी करत गोडमबीची विक्री करून त्यावर उपजीविका भागवणाऱ्या मजुरांना त्यामुळे रोजगाराची आशा निर्माण झालीय. बिबा फळ साधारणतः जानेवारी च्या दुसऱ्या आडवड्या पासून पिकण्यास सुरुवात होते.

### वेगवेगळ्या तेलांची निर्मिती

ग्रामीण भागातील शेतमजूर हे बिबे गोळा करतात. बिब्यापासून काळे बिबे ,बिबाफुल,गोडंबी,व बीबा तेल असे वेगवेगळे पदार्थ तयार केले जातात. पिकलेल्या फुल बिब्याना ३००ते ३५० रुपये किलो भाव मिळतो तर वाळलेल्या फुल बिब्याला प्रति किलो५०० ते ६०० रुपये भाव मिळतो. तर, गोडंबीला बाजारात ७००ते ८०० रुपये किलो भाव मिळतो. सद्या बिब्याची झाडे अत्यंत दुर्मिळ झाली आहे. मात्र, कर्नाटकातील बेळगाव येथे बिब्याची मोठी बाजार पेठ आहे. अनेक बिबा व्यावसायिक हे कर्नाटक राज्यातून बिबा विकत आणून महाराष्ट्रात विक्री करतात.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देवदर्शनासाठी निघालेल्या चौघा भाविकांचा अपघाती मृत्यू

## जिंतूर तालुक्यातील अकोली पुलावर घडली घटना, मयत गंगाखेड तालुक्यातील रहिवाशी





**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** : देवदर्शनासाठी उज्जैनकडे निघालेल्या भाविकांच्या वाहनाचा अकोली पुलाजवळ मध्यरात्री भीषण अपघात होऊन चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्दैवी घटना १२ फेब्रुवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील पाच भाविक उज्जैन येथील धार्मिक तीर्थस्थळी देवदर्शनासाठी गंगाखेडहून जिंतूरमार्गे संभाजीनगरकडे जात होते. जिंतूर शहरापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावरील अकोली पुलाजवळ वाहन









चालकाचा ताबा सुटल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अपघात इतका भीषण होता की मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले.

सामाजिक कार्यकर्ते नागेश आकात, १०८ रुग्णवाहिकेचे डॉ. घुगे व चालक पवार यांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून जखमींना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख मुद्दसीर व रुग्णकक्ष सेवक गंगाधर पालवे यांनी तपासणी केल्यानंतर बालाजी आश्रोबा औटी वय २८ वर्षे, रा. खडकपुरा, बालाप्रसाद उत्तमराव घोरपडे वय ३० वर्ष, रा. तारुमोहल्ला, कृष्णा बालाजी गुट्टे वय २८ वर्ष रा. कोद्री रोड, रोहन संजय राठोर वय २७ वर्षे, रा. लक्ष्मीनगर या चौघांना मृत घोषित केले. तर गोपाळ गणेश रोकडे वय २८ वर्षे रा. खडकपुरा हा अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्याच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे, बिट जमादार दत्तात्रेय गुंगाणे, मेजर थोरवे व पोलीस वाहनचालक पैठणे घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, पोलीस अधीक्षक रवींद्र परदेशी यांनी घटनास्थळ व रुग्णालयाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर काळाने घाला घातल्याने गंगाखेड व जिंतूर परिसरात शोककळा पसरली आहे. जिंतूर ग्रामीण रुग्णालयात डॉ. प्रमोद पारवे, डॉ. मोहिनी हरकळ, रुग्ण कक्ष सेवक गंगाधर पालवे यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधिन केला.

बिट जमादार दत्तात्रय गुंगाणे यांच्या फिर्यादीवरून चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि विजय जाधव करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### एसटी वाहकाने दीड लाखाचे सोने केले परत



**जिंतूर,/प्रतिनिधी:** आगारातील वाहक घोगरे यांच्या गाडीत दीड लाखाचे प्रवाशांचे सोने विसरून राहिले असता त्यांनी कसलाही विचार न करता प्रवाशांचा फोन आल्यानंतर ते सुखरूप वाहक रामचंद्र घुले यांच्याकडे परत देऊन त्या प्रवाशांपर्यंत सुपूर्द केले. चालक वाहक यांच्या प्रमाणिक पनाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

प्रवासा दरम्यान वेळोवेळी घाई गडबडीत प्रवासी वर्गांचे मौलवान वस्तू सोने नाणे विसरून राहतात. अशा वेळी राज्य परिवहन एसटी महामंडळातील चालक वाहक वर्ग आपला प्रामाणिकपणा जपून प्रवाशी वर्गांच्या हरवलेल्या मौल्यवान वस्तू परत देऊन या कलयुगात आपला आदर्श जपतात. आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण स्थानक प्रमुख रामेश्वर सोनवणे व वाहतूक निरीक्षक शरद पाटील यांनी वाहक वाहक घोगरे व रामचंद्र घुले यांचे कौतुक केले आहे.

### ब्रह्मकुमारी मीरादीदी यांना आदर्श कर्तुत्ववान नारीरत्न पुरस्कार जाहीर

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था,जिल्हा सातारा (वाई) यांच्या वतीने संस्थेच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २२ फेब्रुवारी रविवार २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे या सोहळ्यात समाजहितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या,आपल्या सेवाभावी कार्यातून स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या आदरणीय ब्रह्मकुमारी मीरादीदी (प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय,शाखा सोनपेठ यांच्या संचालिका) यांना आदर्श कर्तुत्ववान नारीरत्न २०२६ राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला असून.हा मानाचा पुरस्कार समाजसेवेत भरीव योगदान देणाऱ्या महिलांना प्रेरणा देण्यासाठी दिला जातो.मीरादीदी यांनी अध्यात्म,सामाजिक बांधिलकी,नैतिक मूल्यांची जपणूक तसेच महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली.

या पुरस्कार सोहळ्यास अनिल सावंत (नगराध्यक्ष,वाई), संतोष शिंदे (उद्योजक व समाजसेवक), मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध सिने अभिनेता राजाराम शिंदे (मराठी फेम हुकुमाची राणी), तसेच सिने अभिनेत्री प्रियंका शिंदे (झी मराठी मालिका देव माणूस) यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत महाराष्ट्रातील विविध समाजोपयोगी कार्य करणाऱ्या अनेक गणमान्य व्यक्तींनाही यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम रमेश गरवारे सभाग्रह,लोकमान्य टिळक ग्रंथालय,वाई,जिल्हा सातारा येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मीरादीदी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की,हा सन्मान केवळ माझा वैयक्तिक नसून,संपूर्ण ब्रह्मकुमारी विद्यालयाचा,तसेच ईश्वरीय सेवेचा हा मान-सन्मान आहे. समाजहिताचे कार्य माझ्या हातून सतत घडत राहावे,भारत विश्वगुरू बनण्याच्या दिशेने सतयुगी नवीन विश्वाच्या स्थापनेचे कार्य अधिकाधिक प्रमाणात ईश्वरी संदेशाच्या माध्यमातून पूर्ण व्हावे,हीच ईश्वरचरणी प्रार्थना आहे.पुढे बोलताना त्यांनी सर्व उपस्थितांचे आशीर्वाद व सहकार्य कायम लाभावे,तसेच सामाजिक कार्यासाठी असेच बळ मिळत राहावे,अशी अपेक्षा व्यक्त केली मिरादीदी यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे

### लहान मुलांना हसत-खेळत शिक्षण द्यावे- प्रा.विठ्ठल कांगणे

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** स्वामी विवेकानंद अकॅडमीचे संचालक प्रा.विठ्ठल कांगणे यांनी गंगाखेड शहरातील रुद्राक्ष इंग्लिश स्कूलला (दि.११ फेब्रुवारी बुधवार) रोजी भेट देत लहान मुलांच्या शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले.नर्सरी ते तिसरीपर्यंत शिक्षण देणाऱ्या या शाळेच्या दोन्ही शाखांना दत्त मंदिर परिसर व कोद्री रोड त्यांनी विशेष भेट दिली लहान मुलांचे शिक्षण हे केवळ पाठांतरापुरते मर्यादित न राहता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असावे असे प्रतिपादन प्रा.कांगणे यांनी यावेळी केले.चिमुकल्या विद्यार्थ्यांना हसत-खेळत,आनंदी आणि सकारात्मक वातावरणात शिक्षण दिल्यास त्यांच्या बौद्धिक व मानसिक विकासाला चालना मिळते असे त्यांनी सांगितले. बालवयातील विद्यार्थ्यांना ज्ञान देताना त्यांच्या वयाची गरज, मानसिकता आणि उत्सुकता लक्षात घेऊन अध्यापन पद्धती अवलंबावी यावर त्यांनी विशेष भर दिला.

प्रा.कांगणे यांच्या भेटीप्रसंगी त्यांचा सत्कार रुद्राक्ष इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष नामदेव मुंडे,संचालक धनराज मुंडे,महादेव केंद्रे,मुख्याध्यापिका सुनीता फड,संस्थेचे महारुद्र मुंडे, समाजसेवक अर्जुन लटपटे, लोकनेते गोपीनाथ मुंडे स्कूलचे संचालक लहू घरजाळे,लटपटे,संचालक रवींद्र जाधव,विलास राठोड,मंचक मुंढे आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

### रंगगंध कलासक्त न्यासच्या अभिवाचन स्पर्धेत 'संवाद संगीतांजली' सर्वप्रथम; अंतिम फेरीसाठी निवड

**परभणी,/प्रतिनिधी:** रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव आणि ट्रान्स डेल्टा फाऊंडेशन, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पूज्य पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती अभिवाचन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत राजीव गांधी युवा फोरम, परभणी या संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या 'संवाद संगीतांजली' या अभिवाचनाने प्रथम क्रमांक पटकावला असून अंतिम फेरीसाठी त्याची निवड करण्यात आली आहे.

ही प्राथमिक फेरी ७ फेब्रुवारी रोजी मृदगंध हॉल, सिडको चौक, औरंगाबाद येथे पार पडली. रविशंकर झिंगरे लिखित व किशोर पुराणिक दिग्दर्शित 'संवाद संगीतांजली' या संहितेच्या सादरीकरणात रविशंकर झिंगरे, किशोर पुराणिक आणि श्रीकांत देशपांडे यांचा सहभाग होता. या अभिवाचनात गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या मूळ बंगाली व इंग्रजी कवितांचे मराठी अनुवादन करून त्यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर या स्पर्धेच्या प्राथमिक फ ेऱ्या आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रत्येक केंद्रातून प्रथम क्रमांक व विशेष गुण प्राप्त करणाऱ्या संघाची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात येते. या स्पर्धेची अंतिम फेरी २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी चाळीसगाव येथे रंगणार आहे.

दरम्यान, या स्पर्धेत स्नेहल पुराणिक दिग्दर्शित आणि अरुणा ढेरे यांच्या काव्यप्रतिभेचा आस्वाद देणाऱ्या पुन्हा नव्याने या संहितेचे अभिवाचन बालगंधर्व सांस्कृतिक कला क्रीडा व युवक मंडळ या संस्थेच्या माध्यमातून क्रांती दैठणकर आणि सुषमा कुलकर्णी यांनी सादर केले. या सादरीकरणासाठी क्रांती दैठणकर यांना वाचिक अभिनयाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. या स्पर्धे त सहभागी होऊन पारितोषिक विजेते ठरलेल्या सर्व कलावंतांचे संस्थेचे अध्यक्ष संजय पांडे यांनी अभिनंदन केले.

# परभणी मनपाचा महापौरपदी सय्यद इकबाल, तर उपमहापौरपदी गणेश देशमुख यांची निवड

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** गेल्या अनेक दिवसापासून सुरु असलेल्या रिसॉर्ट पॉलिटिक्स, तोडतोडीच्या चर्चा आणि राजकीय हालचालींचा गुरवारीअखेर शेवट झाला. परभणी महानगरपालिकेच्या महापौरपदी शिवसेना उध्दव बासाहेब ठाकरे गटाचे सय्यद इकबाल तर उपमहापौरपदी काँग्रेसचे गणेश देशमुख यांची बहुमताने निवड झाली आहे.

काँग्रेस उबाठा युतीने केवळ आपले बहुमत टिकवले नाही तर विरोधकांच्या गोटातही खिंडत्तर पाडूनअतिरिक्त मते खेचून आणली आहेत.

गुरुवारी बी.रघुनाथ सभागृहात जिल्हाधिकारी तर पीठासिन अधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या उपस्थितीत हात उंचावून मतदान प्रक्रिया पार पडली.युतीकडे उबाठा २५ आणि काँग्रेस १२ असे ३७ नगरसेवकांचे स्पष्ट बहुमत असतांना, महापौरपदाचे उमेदवार सय्यद इकबाल यांना चक्क ३९ मते पडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गट अक्षय देशमुख आणि एक अपक्ष महिला नगरसेविका राजया बेगम यांनी युतीला पाठींबा दिल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली.

भाजपच्या महापौर पदाच्या उमेदवार तिरुमल्ला खिल्लारे यांना स्वपक्षाची १२ मते, राष्ट्रवादी काँग्रेस, जनसुराज्य शक्ती आणि यशवंत सेनेच्या एका नगरसेवकांचा पाठींबा मिळून २६ पर्यंत मजल मारता आली.

सदर निवडणूक प्रक्रियेसाठी सर्व पक्षीय व अपक्ष अशा एकुण ६५ उमेदवारांची उपस्थिती होती. निवडणूक प्रक्रियेला सुरूवात होण्यापुर्वी काँग्रेस पक्षाचे सदस्य भगवानरावजी वाघमारे यांनी महाराष्ट्राचे माजी



उपमुख्यंमत्री अजीतदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यु झाल्यामुळे त्यांना दोन मिनीट स्तब्धराहून श्रद्धांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव सादर केला. त्यास विजयरावजी जामकर यांनी अनुमोदन दिले, त्यास पिठासीन अधिकारी यांनी मंजूरी देत सर्व उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनतर नगर सचिव यांनी सर्व उपस्थितांना निवड प्रक्रियेची माहिती देऊन निवडणूक प्रक्रियेस सुरूवात केली. तर शिवसेना उबाठा गटाचे सय्यद एकबाल सय्यद खाजा यांच्यासाठी हात उचांवून मतदान करण्याचे आवाहन पिठासीन अधिकारी केले. त्यांना शिवसेना उबाठा गटाचे २५, काँग्रसे १२, राष्ट्रवादी -१ व अपक्ष -१ असे एकुण ३९ सदस्यांचे मतदान पडले. पिठासीन अधिकारी यांनी मतदान केलेल्या उमेदवारांची नावे उपस्थितांना वाचवून दाखवली. प्रक्रिये अंती शिवसेना उबाठा गटाचे सय्यद एकबाल सय्यद खाजा यांना महापौर पदासाठी निवड झाल्याचे घोषीत केले.

या पद्धतीने उपमहापौर पदासाठी मतदान प्रक्रिया पार पडली. उपमहापौर पदासाठी प्राप्त एकुण अर्ज ०७ वैध असल्याचे घोषीत केली. अर्जसादर केलेल्या उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी दिला. त्यात ५ उमेवारांनी अर्ज मागे घेतला. उर्वरीत उमेदवार काँग्रेसचे गणेश सुरेशराव देशमुख व राष्ट्रवादी पक्षाच्या नाजेमा बेगम शे. अ. रहीम यांच्यात उपमहापैार पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. काँग्रेसचे गणेश सुरेशराव देशमुख यांना शिवसेना उबाठा गटाचे २५, काँग्रसे १२ व अपक्ष -१ असे एकुण ३८ सदस्यांचे मतदान पडले. राष्ट्रवादी पक्षाच्या नाजेमा बेगम शे. अ. रहीम यांना भाजपाच्या १२, राष्ट्रवादी ११, जनसुराज्य ३ व यशवंत सेना पक्षाचे १ सदस्य असे एकूण २७ सदस्यांचे मतदान पडले. पिठासीन अधिकारी यांनी मतदान केलेल्या उमेदवारांची नावे उपस्थितांना वाचवून दाखवली.

### बीड येथे मुख्यमंत्री फडणवीस १४ फेब्रुवारीला भेट देणार

**परभणी,/प्रतिनिधी:-** पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या महा पशुधन एक्स्पो २०२६ अंतर्गत आयोजित प्रदर्शन स्थळास राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस शनिवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रदर्शनास भेट देऊन पशुपालकांशी संवाद साधणार आहेत.

१३ फेब्रुवारी ला होणार सुरुवात दरम्यान, या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, दिनांक १३ फ ेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता पार पडणार आहे. राज्याच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री मा. पंकजताई मुंडे यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून आधुनिक शेती व पशुपालन तंत्रज्ञानाची माहिती मिळणारआहे

# ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्यासाठी 'कासा' आणि 'एक्झिम बँक'चा पुढाकार; मासिक पाळी स्वच्छतेवर विशेष कार्यशाळा संपन्न

**गंगाखेड,/प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील महिला आणि किशोरी मुलींमध्ये मासिक पाळीच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी आणि त्यांना शाश्वत पर्यायांची ओळख करून देण्यासाठी कासा संस्था व एक्झिम बँक ( ) यांच्या संयुक्त विद्यमाने गंगाखेड येथे विशेष नियोजन बैठकीचे आपला दवाखान्यात आयोजन करण्यात आले होते.

प्राइड इंडिया संस्था, गंगाखेड येथे बुधवार, ११ फ ेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या बैठकीत गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण महिलांच्या आरोग्य सक्षमीकरणावर भर देण्यात आला. स्वयंसेविकांना मिळाले विशेष प्रशिक्षण या बैठकीचा मुख्य उद्देश गंगाखेड तालुक्यातील गावांमध्ये मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती करणे आणि स्थानिक महिला स्वयंसेविकांना प्रशिक्षित करणे हा होता. गंगाखेड तालुक्यातील २० गावांमधील १७ महिला स्वयंसेविकांनी या प्रशिक्षणात सहभाग नोंदवला. यावेळी कासा संस्थेचे प्रतिनिधी, प्राइड इंडियाचे पदाधिकारी आणि स्थानिक आरोग्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. मान्यवरांचे मार्गदर्शन कार्यक्रमात कासा संस्थेचे श्री. सुनील गायकवाड, श्री. प्रभाकर दळवी आणि श्री. मनोहर मिसाळ यांनी प्रकल्पाची उद्दिष्टे व कार्यपद्धती स्पष्ट केली. प्राइड इंडियाचे प्रकल्प समन्वयक श्री. गणेश काकडे आणि श्री. रुकमाजी गीनगीने यांनी ग्रामीण भागातील आरोग्य आव्हाने आणि स्वयंसेविकांची भूमिका यावर सविस्तर मार्गदर्शन केले. रीयूजेबल पॅड्स: पर्यावरणपूरक आणि सुरक्षित पर्याय



बैठकीत बाजारू डिस्पोजेबल पॅड्स आणि पुनर्वापर करण्यायोग्य सॅनिटरी पॅड () यांची सविस्तर तुलना मांडण्यात आली. रीयूजेबल पॅड्स हे केवळ खिशाला परवडणारे नसून ते पर्यावरणासाठीही सुर उमटत आहेत.

## अग्रलेख...

# तेल गेले, तूप गेले अन्...

एक जुनी गोष्ट आहे. आईने सांगितल्याप्रमाणे मुलगा तेल आणि तूप घ्यायला बाजारात गेला होता. या वस्तू आणण्यासाठी त्याने धुपाटणे सोबत घेतले. हे एक उभे पात्र असते, ज्यात दोन्ही बाजूला जागा असते. त्याने दुकानदाराकडून वरच्या भागात तेल घेतले. दुकानदार म्हणाला, तूप कुठे देऊ. तर त्या मुलाने पात्र उलटे केले आणि त्यात तूप घेतले आणि परत फिरला. रस्त्यात त्याला आठवले की, तेल सुरक्षित आहे की नाही बघितले पाहिजे आणि म्हणून त्याने पात्र पुन्हा उलटे केले. त्या क्षणी तूपही गेले होते. शेवटी 'तेल गेले, तूप गेले अन् हाती केवळ धुपाटणे राहिले', अशी त्याची स्थिती झाली.

ही बोधकथा आठवण्याचे कारण म्हणजे, चंद्रपूर महानगराच्या महापौर व उपमहापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या तोंडापर्यंत आलेला सत्तेचा घास या पक्षाचे नेते खा. प्रतिभा धानोरकर व आ. विजय वडेट्टीवार यांच्यातील कमालीच्या भांडणाने आणि पराकोटीच्या अहंकारामुळे हिरावला गेला. २७ नगरसेवकांच्या बळावर सर्वांत मोठा पक्ष म्हणून पुढे आलेल्या काँग्रेसला मित्रपक्ष असलेल्या जनविकास सेनेच्या ३ नगरसेवकांचे बळ आधीच मिळाले होते. जनविकास सेनेने 'एआयएमआयएम'च्या एका नगरसेवकाला आपल्या गटात घेतल्याने तोही काँग्रेसचा नैसर्गिक मित्र होता. अशा एकूण ३१ सदस्यांच्या ताकदीवर काँग्रेस पक्ष अगदी सहजतेने सत्ता काबीज करू शकला असता. बहुमत सिद्ध करायला अवघ्या ३ सदस्यांची गरज होती. त्यातही निवडून आलेले दोन अपक्ष सदस्य हे काँग्रेसचेच बंडखोर होते. आ. वडेट्टीवार यांची जवळीक असलेल्या या दोघांचीही 'घरवापसी' अशक्य नव्हती. शिवाय, शिवसेना उबाठा पक्ष तडजोडीसाठी तयार होताच. पण अहंकार आडवा आला.

'तेल गेले, तूप गेले', ही म्हण या काँग्रेसच्या नेत्यांना किती चपखल लागू पडते, हे वेगळ्याने सांगण्याची गरज नाही. त्यांच्या वादामुळे ज्या पक्षाकडे जनतेने सर्वाधिक नगरसेवक देऊन सत्तेचा कौल दिला होता, त्या पक्षाला सत्तेचे एकही पद मिळाले नाही! महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या चंद्रपूरच्या या निकालाची चर्चा चवीने केली जात आहे. २७ नगरसेवक निवडून आणूनही सत्तेबाहेर राहणे, हे खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार विजय वडेट्टीवार यांच्यातील अंतर्गत कलहाचेच फळ आहे. मित्रपक्षांना सोबत घेऊन चालण्याची प्रगल्भता दाखवण्याऐवजी, ते तर आमच्या दावणीलाच बांधले आहेत, हा अहंकार त्यांना नडला. उलट, भारतीय जनता पक्षाने बहुमतापासून खूप दूर असताना आणि तब्बल १० नगरसेवकांची गरज असताना, अगदी शेवटपर्यंत अत्यंत सजग राहून सत्ताकारणाचे उत्तम उदाहरण दाखवून दिले. विजयाचा जल्लोष साजरा होत असताना कार्यकर्त्यांनी आ. सुधीर मुनगंटीवार हे 'किंगमेकर' असल्याचे फलक मिरवले, यातच सारे काही आले. त्यांच्यासारख्या चाणाक्ष आणि मुत्सद्दी नेत्याच्या मार्गदर्शनाखाली भाजपने कमी संख्या असतानाही बाजी मारली. निवडणुकीदरम्यान अतिशय संयमी, पण आत्मविश्वासाने भरलेल्या मुनगंटीवारांच्या वक्तव्याची जराशी दखल जरी काँग्रेसच्या नेत्यांनी घेतली असती, तरी त्यांच्यावर नामुष्कीची पाळी आली नसती. भाजप आणि उबाठा यांच्यातील अनपेक्षित युती हा केवळ योगायोग नव्हता. ती सुनियोजित रणनीती होती. त्याची इतिश्री मंगळवारी मतदानाला येताना अगदी रस्त्यात गाड्या उभ्या करून अंतिम तडजोडीने झाली. काँग्रेस मात्र गाफील राहिली.

चंद्रपूरच्या निवडणुकीने राजकारणातील अनिश्चिततेचा आगळा थरार अनुभवला. अवघ्या एका मताने भाजपच्या संगीता खांडेकर यांचा विजय राजकारणात शेवटच्या मिनिटापर्यंत लढणे कसे महत्त्वाचे असते, हे सांगणारे होते. तर, उपमहापौरपदाचा सामना जेव्हा बरोबरीत सुटला आणि 'ईश्वरचिठी'ने उबाठाचे प्रशांत दानव यांची वर्णी लागली, तेव्हा नशीबही फक्त खऱ्या योद्ध्याला साथ देते हे अधोरेखित झाले. भाजपने रणनीती आखली आणि ती प्रत्यक्षात उतरवली. या सगळ्या नाट्यातून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते की, केवळ संख्याबळ असणे पुरेसे नसते, तर ते सांभाळण्यासाठी आणि योग्य वेळी वापरण्यासाठी मुनगंटीवार यांच्यासारख्या चाणाक्ष पुढाऱ्याचीच गरज लागते. काँग्रेससाठी आता पश्चात्ताप करण्यापलीकडे दुसरा पर्याय उरलेला नाही.

चंद्रपूरप्रमाणेच महाराष्ट्रातील इतर महानगरांमध्येही भाजपने आपली सजगता दाखवून दिली आहे. तब्बल २५ वर्षांची ठाकरेंची सत्ता मोडीत काढत भाजपने मुंबईवर भगवा फडकवला. तिथे रितू तावडे यांना महापौरपदी बसवून इतिहास रचला गेला. मुंबईसारखे महत्त्वाचे शहर ताब्यात घेण्यासाठी या पक्षाने दाखवलेली संघटनात्मक ताकद वाखाणण्याजोगी आहे. पुणे आणि नागपूरमध्ये तर आधीच भाजपने आपले बालेकिल्ले मजबूत केले आहेत. पुण्यातील पवारांच्या वर्चस्वाला धक्का देत आपली पकड घट्ट केली, हे त्या पक्षाच्या सातत्यपूर्ण कर्माचे फळ आहे. ध्येयनिष्ठ विकास घडवून आणण्यासाठी नाही म्हटले तरी सत्तेची गरज असते. ती मिळवण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागते आणि ते भाजप करताना दिसते. उलट, काँग्रेस सततच्या पराभवानंतरही ही गोष्ट आत्मसात करायला तयार नाही. विकासाच्या ध्येयपथावर सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती हे भाजपचे वैशिष्ट्य आहे. उलट, चंद्रपूर महानगराच्या निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्यांनी अन्य मित्रपक्षांचा अजिबात विचारच केला नाही. आपसात भांडून खा. धानोरकर व आ. वडेट्टीवार यांनी महापौर व उपमहापौरपद आपसात वाटून घेतले आणि उबाठा, जनविकास सेना यांना स्थायी समितीचे अध्यक्षपद तेवढे देण्याची तयारी दाखवली. उबाठा त्यावर ऐकणार नाही, हे सर्वांना कळत होते. ते काँग्रेस नेत्यांना का उमजले नाही, हे मात्र न समजण्यापलीकडचे आहे. खरे तर, सर्वांत मोठी अडचण खा. धानोरकर व आ. वडेट्टीवार यांच्यातील तीव्र स्पर्धेत दडलेली आहे. 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है', असा राग आलापणाऱ्या धानोरकर यांना, वडेट्टीवार कधीच सहन झाले नाहीत. त्यांनी चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत नाक खुपसू नये, अशीच त्यांची आधीपासून इच्छा होती आणि त्यामुळे अगदी निवडणुकीच्या प्रचारापासूनच या दोन्ही काँग्रेसी नेत्यांमध्ये गृहयुद्ध सुरू राहिले. तरीही जनतेने काँग्रेसला २७ नगरसेवक दिले. वडेट्टीवार आणि धानोरकर यांनी मात्र काँग्रेसच्या नगरसेवकांना पक्षाचे कधी मानलेच नाही, तर 'हा माझा, हा तुझा' असेच त्यांचे नामाभिधान करून त्यांना विभाजित केले. कमी पडले तर एकमेकांचेच नगरसेवक पळवले; जसे विरोधक पळवतात तसे! आपापल्या गटाची वेगळी नोंदणी करण्याचे कारस्थानही केले गेले. उघड्या डोळ्यांनी पक्षश्रेष्ठी हे सारे बघत राहिले. आपल्या आटोक्यातले हे नाही, याची खात्री प्रदेशाध्यक्षांना पटली तेव्हा हा वाद दिल्ली दरबारी पोहोचला. दिल्लीच्या तहाप्रमाणे, महापौरपद धानोरकर गटाकडे, तर उपमहापौरपद वडेट्टीवार गटाकडे देण्याचे ठरले. या तडजोडीमुळे आनंदात असलेल्या या नेत्यांना याची जाणीवच झाली नाही, की दोन्ही पदे जर तुमच्याकडेच राहणार असतील, तर मित्रपक्षाचे काय? उबाठा पक्ष जणू आपल्या दावणीलाच बांधला आहे, असे समजून त्यांनी त्यांच्या ६ नगरसेवकांना गृहीत धरले. आधीचा मित्रपक्ष असलेल्या जनविकास सेनेला तर विश्वासातच घेतले नाही. बंडखोरांची समजूत काढण्यासाठी आपला अहंकारही त्यांनी दूर सारला नाही. शेवटी सारेच तुटले.

अगदी दगडाला जरी काँग्रेस पक्षाचा उमेदवार केला तरी तो सहज निवडून येईल, असा चंद्रपूर जिल्ह्यात एकेकाळी काँग्रेसचा दबदबा होता. २०१९ च्या निवडणुकीत बाळू धानोरकर यांनी अवघ्या महाराष्ट्रात एकमेव अशी चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची जागा राखत विक्रम नोंदवला होता. खा. प्रतिभा धानोरकर या त्यांच्याच अर्धांगिनी आहेत. पण त्यांच्या आणि राज्यात काँग्रेसचा मातब्बर नेता म्हणून ओळख असलेल्या आ. विजय वडेट्टीवार यांच्या हट्टापायी पक्षाच्या त्या पुण्याईची लक्तरे वेशीवर टांगण्याचा प्रकार चंद्रपुरात घडला. या पक्षाचे सर्वांत मोठे दुर्दैव कोणते असेल, तर अशा मोठ्या नेत्यांना आवरण्याची धमक पक्षश्रेष्ठींमध्ये उरलेली नाही. काँग्रेस पक्ष दिवसेंदिवस कसा रसातळाला जात आहे, याचे ताजे उदाहरण चंद्रपूर आहे, हे वास्तव हा पक्ष जेवढ्या लवकर मान्य करेल, तेवढे काँग्रेससाठी बरे. बाकी राजकारण आपल्या पद्धतीने होतच राहणार!

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ हवे

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांतील प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकित करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्त्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सुकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्त्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९० च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पृष्ठभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये.

२०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये करधोरणाच्या दृष्टीने 'सेफ हार्बर' नियमांमध्ये करण्यात आलेली सुधारणा आयटी क्षेत्रासाठी दिलासादायक आहे. सेफ हार्बरची मर्यादा लक्षणीयरीत्या वाढवण्यात आल्याने मोठ्या उलाढाली असलेल्या कंपन्यांनाही कर निर्धारणात निश्चितता मिळणार आहे. कर वाद, नोटिसा आणि प्रदीर्घ न्यायप्रक्रिया यापासून उद्योगांची सुटका होऊन कंपन्या मुख्य व्यवसायावर अधिक लक्ष केंद्रित करू शकतील. याचा थेट परिणाम उत्पादकतेवर आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर होणार आहे.

ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाऊड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाऊड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील युवकांना आयटी कौशल्ये मिळावीत, महिलांचा तंत्रज्ञान क्षेत्रातील सहभाग वाढावा आणि नवीन पिढी भविष्यातील नोकऱ्यांसाठी सज्ज व्हावी यासाठी विविध योजना आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. यामुळे आयटी क्षेत्राचा सामाजिक प्रभाव अधिक व्यापक होणार आहे.

आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादित न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाईन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे.

एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# सब्जेक्ट टु मार्केट रिस्क

मार्च महिना जवळ आला की देशभरात गुंतवणुकीचा महोत्सव सुरू होतो. टेलिव्हिजन, मोबाईल, वृत्तपत्र, सोशल मीडिया-सर्वत्र शेअर मार्केट, म्युच्युअल फंड, इन्शुरन्स, टॅक्स सेव्हिंग प्लॅन यांच्या जाहिरातींचा पूर येतो. आता गुंतवा भविष्यात सुरक्षित व्हा, डबल रिटर्न, टॅक्समध्ये मोठी सूट अशा आकर्षक शब्दांत सर्वसामान्य माणसाला स्वप्नं दाखवली जातात. मार्च अखेरपर्यंत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होतेही. मात्र प्रश्न असा आहे की, ही गुंतवणूक करताना सामान्य माणसाला त्या योजनेची खरी माहिती असते का?

बहुतेक वेळा उत्तर नकारार्थीच असते. किती रिटर्न मिळणार, त्यावर किती टॅक्स लागणार, तो रिटर्न हमखास आहे की बाजारावर अवलंबून आहे, तोटा झाला तर जबाबदारी कुणाची, या मूलभूत प्रश्नांची उत्तरे न समजूनच अनेक जण आपली आयुष्यभराची जमापुंजी गुंतवतात. काही महिन्यांनी बाजार घसरतो, युनिट्सची किंमत कमी होते आणि मग डोक्यावर हात मारून बसायची वेळ येते.

या सगळ्या जाहिरातींच्या शेवटी एक वाक्य हमखास असतं- 'सब्जेक्ट टु मार्केट रिस्क.' हे वाक्य इतक्या झपाट्याने, इतक्या छोट्या अक्षरांत वाचून दाखवलं जातं की सामान्य माणसाला त्याचा अर्थ कळण्याआधीच जाहिरात संपते. मोठे अभिनेते, क्रिकेटपटू, सेलिब्रिटी हे प्रॉडक्ट्स प्रमोट करतात, त्यामुळे लोकांचा विश्वास आणखी वाढतो. सचिन सांगतोय म्हणजे बरोबरच असेल, धोनीने केलंय म्हणजे सुरक्षितच असेल, असा समज तयार होतो. मात्र अलिकडेच काही नामवंत क्रिकेटपटूंना सेबी व आयआरडीएने नोटीस दिल्याच्या बातम्या समोर आल्या. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते जाहिरात करणारी सेलिब्रिटी जबाबदार नसते, जबाबदारी शेवटी गुंतवणूकदाराचीच असते. मग प्रश्न उरतो, 'सब्जेक्ट टु मार्केट रिस्क' म्हणजे नेमकं काय? याचा साधा अर्थ असा की, या गुंतवणुकीवरचा नफा किंवा तोटा पूर्णपणे बाजारावर अवलंबून आहे. इथे हमी नाही, खात्री नाही, निश्चित रिटर्न नाही. बाजार वाढला तर फायदा, घसरला तर नुकसान- इतकंच सरळ गणित आहे. पण ही गोष्ट सर्वसामान्य माणसाला किती जण समजावून सांगतात? म्हणूनच गुंतवणूक करताना काही खबरदारी अत्यावश्यक आहे.




कोणतीही योजना घेताना फक्त जाहिरात पाहून निर्णय घेऊ नका. योजनेची कागदपत्रे नीट वाचा, टॅक्सचे नियम समजून घ्या, तुमची जोखीम घेण्याची क्षमता तपासा. हमी आणि अंदाज यातला फरक ओळखा. शक्य असेल तर स्वतंत्र, विश्वासार्ह आर्थिक सल्लागाराचा सल्ला घ्या- सेल्समनचा नाही. गुंतवणूक चुकीची नाही, पण अज्ञानातून केलेली गुंतवणूक धोकादायक आहे. 'सब्जेक्ट टु मार्केट रिस्क' हे फक्त वाक्य नाही, ती एक स्पष्ट सूचना आहे, पण ती समजून घेण्याची जबाबदारी आपली आहे. अन्यथा मार्चमध्ये गुंतवणूक आणि एप्रिलमध्ये पश्चात्ताप, हेच सर्वसामान्य माणसाचं नशीब बनून राहील. गुंतवणूक चुकीची नाही, पण अज्ञानातून केलेली गुंतवणूक धोकादायक आहे. म्युच्युअल फंड, शेअर मार्केट, युलिप, हायब्रिड प्लॅन सर्व काही भविष्यासाठी सर्वोत्तम म्हणून मांडलं जातं. पण या झगमगाटामागे एक प्रश्न कायम दुर्लक्षित राहतो की या सगळ्यांच नियमन नेमकं कोण आणि किती प्रभावी? सेबी, आयआरडीए, अर्थ मंत्रालय हे सगळे रेग्युलेटर फक्त नियम बनवण्यासाठी आहेत की सर्वसामान्य गुंतवणूकदाराचं संरक्षण करण्यासाठी? जाहिरातीच्या शेवटी वेगात वाचलं जाणारं सब्जेक्ट टु मार्केट रिस्क एवढीच काय ती त्यांची जबाबदारी उरली आहे का? सामान्य माणसाला हे वाक्य समजत नसेल, तर तो दोष कुणाचा, गुंतवणूकदाराचा की यंत्रणेचा? आज बाजाराधिष्ठित उत्पादनांची जाहिरात करताना मोठमोठे सेलिब्रिटी पुढे येतात. पण बाजार कोसळला, रिटर्न शून्य झाला, गुंतवणूक अर्धी बुडाली की कोणीही पुढे येत नाही. तेव्हा रेग्युलेटर फक्त तुम्ही धोका स्वीकारला होता असं सांगून मोकळे होतात. मग प्रश्न उभा राहतो की सर्व धोका सामान्य माणसाचाच आणि नफा सगळ्यांचाच का? रेग्युलेटर बाजाराला मोकळं रान देतात, पण सरकारी संस्थांवर नियमांची कात्री लावतात, हा विरोधाभासही विचार करण्यासारखा आहे. एलआयसीसारख्या संस्थांवर हमीची जबाबदारी, पारदर्शकता, सामाजिक बांधिलकी सगळं बंधनकारक. पण खाजगी, बाजाराधिष्ठित उत्पादनांमध्ये नुकसान झालं की मार्केट रिस्क नावाची ढाल पुढे केली जाते. आज गरज आहे ती गुंतवणूकदार शिक्षणाच्या जाहिरातींची, स्पष्ट भाषेत जोखीम समजावून सांगण्याची आणि दिशाभूल करणाऱ्या प्रचारावर कठोर कारवाईची. रेग्युलेटरने फक्त नोटीस पाठवण्यापुरतं न थांबता, सामान्य माणसाच्या हिताचं रक्षण हे आपलं मुख्य उद्दिष्ट मानलं पाहिजे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र


श्यामकांत जहागीरदार

# लोकसभा सभापतींविरुद्धचे अविश्वास प्रस्ताव

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्तावाची सूचना काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी लोकसभेत सादर केल्यामुळे राजधानी दिल्लीत राजकीय वातावरण तापले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्धच्या महाभियोग प्रस्तावावरून धक्कादायक राजकीय घडामोडी घडल्या होत्या. यावेळी अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांतील विशेषतः काँग्रेसमधील संघर्षाने गाजत आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी लोकसभेत जो गदारोळ झाला, त्याने संसदीय लोकशाहीचा आतापर्यंतचा गौरवशाली इतिहास कलंकित झाला. संसदेच्या प्रत्येक अधिवेशनात लोकसभेत आणि राज्यसभेत गदारोळ होत असतो. अध्यक्ष वा सभापतींच्या आसनासमोर येऊन हातात पोस्टर्स फडकवत घोषणाबाजी करणे काही नवीन नाही. संसदेत गदारोळ झाला नाही, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गोंधळ घातला नाही, असे एकही अधिवेशन आजपर्यंत झाले असेल, असे वाटत नाही.

पण यावेळी विरोधी पक्षाच्या महिला सदस्यांनी पंतप्रधानांच्या आसनाच्या दिशेने धाव घेत त्याठिकाणी घोषणाबाजी केली. एकप्रकारे पंतप्रधानांना घेराव घालण्याचा प्रयत्न केला. काहीतरी अप्रिय करण्याचा विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांचा प्रयत्न आहे, याची कल्पना आल्यामुळे सभापती ओम बिर्ला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सभागृहात येण्यापासून रोखले. त्यामुळे संभाव्य अनुचित प्रसंग टळला. यामुळे पंतप्रधानांना अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देता आले नाही. पंतप्रधानांच्या उत्तराच्या भाषणाशिवायच धन्यवाद प्रस्ताव लोकसभेला पारित करावा लागला. लोकसभेत सातत्याने सुरू असलेल्या गोंधळाची परिणती आठ सदस्यांच्या अधिवेशन संपेपर्यंतच्या निलंबनात झाली. याआधी याच्यापेक्षा जास्त सदस्य लोकसभेत आणि राज्यसभेत निलंबित झाले आहेत. एका अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या मिळून सव्वाशेवर सदस्यांना निलंबित करण्यात आले होते. पण यावेळी विरोधकांनी लोकसभेच्या सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करून आरपारच्या लढाईचे संकेत दिले आहेत. या लढाईचा निकाल काय आहे, हे त्यांनाही माहिती आहे. लोकसभेत भाजपाच्या नेतृत्वातील सत्तारूढ रालोआचे बहुमत असल्यामुळे हा प्रस्ताव पारित होऊ शकणार नाही, याची जाणीव विरोधी पक्षांना नाही, असे नाही. तरी सुद्धा त्यांनी ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.



लोकसभेच्या सभापतींना पदावरून हटवण्यासाठी जो प्रस्ताव आणला जातो, त्याला तांत्रिकदृष्ट्या अविश्वास प्रस्ताव म्हणजे 'नो कॉन्फिडन्स मोशन' म्हणत नाही, तर 'रिझोल्युशन टु रिमुव्ह स्पीकर' असे म्हटले जाते. घटनेच्या ९४ सीनुसार दोन सदस्य असा प्रस्ताव देऊ शकतात. यावेळच्या सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर ११८ सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. अविश्वास प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी विरोधी पक्षांच्या सदस्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय भाषण करता येते, आपल्या मनातील भावना व्यक्त करता येतात. विरोधी पक्षांच्या दृष्टीने अविश्वास प्रस्तावाची उपलब्धी एवढीच आहे. लोकसभेच्या सभापतींविरुद्ध सादर झालेला हा चौथा अविश्वास प्रस्ताव आहे. विशेष म्हणजे यातील एकही अविश्वास प्रस्ताव आतापर्यंत पारित होऊ शकला नाही.

१८ डिसेंबर १९५४ ला लोकसभेचे पहिले सभापती गणेश वासुदेव उपाध्य दादासाहेब मावळणकर यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आला होता. समाजवादी पक्षाचे विघ्नेश्वर मिश्रा आणि २१ सदस्यांनी या प्रस्तावाची सूचना दिली होती. मावळणकर यांची सभागृहातील भूमिका निष्पक्ष नाही, तर सत्ताधारी काँग्रेसच्या सदस्यांना ते झुकते माप देतात, विरोधकांच्या स्थगन प्रस्तावाच्या सूचना फेटाळून लावतात, असा आरोप तेव्हा त्यांच्यावर अविश्वास प्रस्ताव आणताना विरोधी पक्षांनी केला होता. दोन तासांच्या सभागृहातील चर्चेनंतर हा प्रस्ताव फेटाळला गेला. या चर्चेत तेव्हाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचेही भाषण झाले होते. विरोधकांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव हा दुर्भावनापूर्ण आहे, विरोधकांनी पूर्ण न वाचताच या प्रस्तावावर स्वाक्षरी केली असावी, असे वाटते. लोकसभेचे सभापती हे निष्पक्षता आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेचे प्रतीक आहेत. अध्यक्षांसमोर असणाऱ्या आव्हानांकडे आम्हाला दुर्लक्ष करता येणार नाही, असे नेहरू तेव्हा म्हणाले होते. सभापतींविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव हा एका व्यक्तीविरुद्ध नाही तर सभागृहाच्या सर्वोच्च अशा प्रतिष्ठेविरुद्ध आहे, याकडे नेहरू यांनी लक्ष वेधले होते. प्रस्तावाला समर्थन देणाऱ्या डाव्या पक्षांचा लोकशाहीवर विश्वास नसल्याचा आरोपही नेहरूंनी केला होता. सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांपेक्षा विरोधी पक्षांच्या सदस्यांना जास्त वेळ द्यावा, त्यांना त्यांचे म्हणणे सभागृहात मांडू द्यावे, असे आवाहनही नेहरू यांनी केले होते. विशेष म्हणजे या अविश्वास प्रस्तावावरील चर्चेचा कोणताही व्हीप जारी न करता सदस्यांना सद्सदविवेकबुद्धीने मतदान करण्याचे स्वातंत्र्य नेहरू यांनी काँग्रेसच्या सदस्यांना दिले होते. हा अविश्वास प्रस्ताव मोठ्या फरकाने फेटाळला गेला.

सभापतींविरुद्धचा दुसरा अविश्वास प्रस्ताव २४ नोव्हेंबर १९६६ ला लोकसभेचे तत्कालीन सभापती सरदार हुकूमसिंह यांच्याविरुद्ध समाजवादी पक्षाचेच मधु लिमये यांनी आणला होता. पण या प्रस्तावाला ५० सदस्यांचा पाठिंबा न मिळाल्यामुळे तो बारगळला होता. तिसरा अविश्वास प्रस्ताव बलराम जाखड यांच्याविरुद्ध माकपचे सोमनाथ चटर्जी यांनी दाखल केला होता. हा प्रस्तावही बहुमताच्या अभावी फेटाळला गेला होता. लोकसभेच्या सभापतींविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करणारे माकपचे सोमनाथ चटर्जी नंतर लोकसभेचे सभापतीही झाले होते. सुदैवाने त्यांना अविश्वास प्रस्तावाचा सामना करावा लागला नाही.


काँग्रेसच्या अविश्वास प्रस्तावावर लोकसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिल्या दिवशी म्हणजे ९ मार्चला चर्चा होण्याची शक्यता आहे. हा प्रस्ताव चर्चेला घेतल्यानंतर त्याच्या समर्थनार्थ ५० खासदारांनी उभे राहून त्याला समर्थन दिले पाहिजे. ५० खासदारांनी उभे राहून प्रस्तावाला समर्थन दिल्यानंतर सभागृहात त्यावर चर्चा होते. विशेष म्हणजे या चर्चेला उत्तर देण्याचा म्हणजे आपल्यावरील आरोप खोडून काढण्याचा अधिकार सभापतींना मिळत असतो. हा प्रस्ताव पारित झाल्यानंतर त्यांना हटवता येते. पण आजपर्यंत आपल्या संसदेत लोकसभा सभापतींना मुदत संपण्याच्या आधी अविश्वास प्रस्तावाच्या माध्यमातून हटवण्यात आले नाही. यावेळीही लोकसभेत सत्ताधारी पक्षाचे पूर्ण आणि निर्विवाद बहुमत असल्यामुळे हा अविश्वास प्रस्ताव फेटाळला जाणार, हे निश्चित आहे.

ओम बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव मांडून काँग्रेसने 'आ बैल मुझे मार'ची स्थिती आपल्या हाताने ओढवून घेतली आहे. विनाशकाले विपरीत बुध्दी असे काँग्रेसच्या या भूमिकेचे वर्णन करायला हरकत नाही.

९८८१७१७८१७

### एआय नियंत्रित वाहतूक सिग्नल फायद्याचे

वरील विषयाशी संबंधित बातमी वाचली व नागपूरच्या बेशिस्त वाहतुकीला आता नियंत्रण लाभेल याची आशा पल्लवित झाली. नागपूरला नुसत्या दुचाकीच नव्हे तर, ऑटो व कधी कधी चारचाकी वाहने सुद्धा अकस्मात उलट दिशेने येऊन अपघाताची शक्यता वाढवतात. चालकाला हटकले तर मुजोरी करतात. 'पुलीस कुछ कहते नहीं, तू क्यौं बोलता है', अशी नागपुरी भाषेत दाट ऐकावी लागते. बेशिस्त व आळशी लोक भेकड असतात. कायद्याचा बडगा उगारल्याशिवाय ते सुधारत नाहीत. याविषयी पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता, ते 'स्टाफची कमी असल्याचे' सांगतात व बाहेर देशात असे प्रश्न का उद्भवत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. मागे नागपुरात अनेक प्रमुख चौकांत कॅमेरे लावलेले होते, पण ते आता काढून टाकण्याचे कारण समजले नाही.



भारत आता प्रगत देश होण्याकडे वाटचाल करीत आहे. एआय सिग्नलसारख्या आधुनिक पद्धतीमुळे लोकांना शिस्त लागेल व विकासकार्यात नक्कीच मदत होईल. बाहेरच्या अनेक देशांमध्ये अशी प्रणाली कार्यरत आहे व नियम तोडल्यास काही क्षणातच दंड झाल्याचा संदेश फोनवर येतो. यामुळे अपघातांना आळा बसतो व निर्दोष जिवांचे प्राण वाचतात. ही आधुनिक प्रणाली काही लोकांना आवडणार नाही, पण बहुतेकांच्या मते ही सर्वांच्या फायद्याचीच आहे, हे सिद्ध होईल.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### शहरातील आव्हाने...

शहरे हे आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक केंद्रे असून त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. परंतु, वाढती लोकसंख्या, जागेचा अभाव, प्रदूषण, वाहतूक अडचणी आणि पायाभूत सुविधा यासारखी अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांवर योग्य तोडगा शोधणे आवश्यक आहे, जेणेकरून शहरांचा विकास संतुलित आणि शाश्वत होईल. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे ताण वाढत आहे. नवीन उद्योग, रोजगार संधी आणि शिक्षणासाठी लोक शहरांकडे वळतात. मात्र, यामुळे जागेचा तुटवडा, वाहतूक कोंडी, कचऱ्याचे व्यवस्थापन आणि प्रदूषण या समस्यांना जन्म देतो. याशिवाय, पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, पाणीपुरवठा आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजा भागवण्यात अडचणी येतात.

आजच्या जगात शहरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची झाली आहे. उद्योगधंदे, शिक्षण संस्था, रोजगार अशा अनेक संधी शहरांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. परंतु, या वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, ज्या शहरातील जीवनावर परिणाम करतात. शहरातील मुख्य आव्हाने म्हणजे वाहतूक कोंडी, वायुप्रदूषण, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, वाढीव लोकसंख्या, रहिवाशांची गरिबी आणि आरोग्यसेवा. वाहतूक कोंडीमुळे वेळेची हानी होते आणि वायुप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. पाणीटंचाईमुळे पिण्याच्या पाण्याचा अभाव असतो, तर कचरा व्यवस्थापनाच्या अभावाने शहरांमध्ये आरोग्य धोक्याची शक्यता वाढते. याशिवाय, वाढती लोकसंख्या ही शहरातील संसाधनांवर ताण आणते, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्रास होतो. शहरातील या आव्हानांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. योग्य त्या उपाययोजना राबविल्यास, जसे की, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, पाणीसंवर्धन, कचरा व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करणे, पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी फुटपाथ, तर या समस्या काहीशी कमी होऊ शकतात. शहरी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी या आव्हानांवर योग्य ते लक्ष देणे आवश्यक आहे. नागरिक, प्रशासन आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधल्यास, शहरांचे भवितव्य अधिक सुरक्षित आणि सुसूत्र बनू शकते. एकत्रित प्रयत्नांनीच आपण या आव्हानांना सामोरे जाऊ शकतो. वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडते, त्यामळे प्रवास वेळखाऊ होतो. वाढत्या लोकसंख्येमुळे घर, रस्ते, उद्याने यासाठी जागा कमी होते. कचऱ्याचा योग्यप्रकारे निपटारा होत नाही, ज्यामुळे पर्यावरण, पाणी आणि वीज, रस्ते, सार्वजनिक वाहतूक या सुविधांची कमतरता. लोकसंख्येच्या प्रमाणे आरोग्य व शिक्षण सुविधा अपुरी पडतात.

शहरातील या आव्हानांवर योग्य धोरणे, तंत्रज्ञानाचा वापर आणि जनसहभागाने मात केली जाऊ शकते. शाश्वत विकासासाठी नवे धोरण, प्रदूषण नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, कचऱ्याचा योग्य निपटारा व पायाभूत सुविधा वाढवणे महत्त्वाचे आहे. तसेच, नागरिकांची जागरूकता व सहभाग आवश्यक आहे. शहरातील आव्हाने टाळण्यासाठी सर्व स्तरांवर सहकार्य आणि जबाबदारीची भावना आवश्यक आहे. शहरांचा विकास म्हणजेच लोकांचे जीवनमान उंचावणे, पर्यावरण रक्षण आणि भविष्यासाठी टिकाऊ योजना आखणे. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करणे गरजेचे आहे, जेणेकरून शहरे सुरक्षित व सशक्त बनू शकतील.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विद्युत उपकेंद्राची प्रलंबित कामे करणाऱ्यांची ठेकेदारी रद्द

## * जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्र्यांचे आदेश
## * आ. अभिमन्यू पवारांच्या मागणीला यश

तभा वृत्तसेवा

**औसा, दि. १२ फेब्रुवारी :** औसा मतदारसंघातील ११ विद्युत उपकेंद्राची कामे मुदत संपुनही संथ गतीने सुरु असल्याची बाब आ. अभिमन्यू पवार यांनी बैठकीत आणुन दिली. व संबंधिताकडून कामे काढून सक्षम ठेकेदाराकडून पूर्ण करुन करुन घ्यावीत, अशी मागणी केली. याची तात्काळ दखल घेत संबंधितांना काळ्या यादीत टाकून दुसऱ्या ठेकेदाराकडून कामे पूर्ण करण्याच्या स्पष्ट सुचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावेळी दिल्या आहेत.

लातूर जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी आ. पवार यांनी मागणी केली होती. याचबरोबर हिंदकेसरी पैलवान हरिश्चंद्रमामा बिराजदार यांच्या जन्मभूमीमुळे औसा मतदारसंघाला लाभलेल्या कुस्ती परंपरेचा उल्लेख करत



रामलिंग मुदगड, देवताळा आणि भुसणी या तीन गावांत तालीम मंजूर करण्यात यावी, अशी मागणी आमदार पवार यांनी केली.

शेती नियोजन व आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी गावनिहाय पर्जन्यमापक यंत्रे बसविण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला. लातूर शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर ट्रॅफिक कंट्रोलसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची आणि गंजगोलाई परिसर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रभावी कार्यवाही करण्याची मागणी केली.ग्रामीण भागातील स्मशानभूमीसाठी भूसंपादन करण्याकरिता ग्रामपंचायतींना विशेष निधी द्यावा. अशी मागणी करताना शेतकऱ्यांच्या समस्यांकडेही त्यांनी लक्ष वेधले. ओव्हरलोड डीपीमुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने अशा डीपींचे चिन्हांकन करून नवीन डीपी उपलब्ध करून द्याव्यात. अशी मागणी करण्यात आली.

किल्लारी गावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली. जिल्हा प्रशासनाने सादर केलेल्या पुर हानी कार्यक्रमास तातडीने मंजुरी द्यावी. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेली कामे प्राधान्याने व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

### निळकंठेश्वराच्या विकासासाठी आरक्षण बदलीचा प्रस्ताव दाखल करा - आमदार अभिमन्यू पवार

निळकंठेश्वर देवस्थानाच्या विकासासाठी गावठाणातील ५ हेक्टर जागा व ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध आहे. परंतू संबंधित जागेवर आरक्षण असल्यामुळे काम सुरू होऊ शकलेले नाही. आरक्षण बदलीचा प्रस्ताव तात्काळ सादर करून विकासकामांना गती द्यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली.

### औसा मतदारसंघाचा रोड मॅप तयार

औसा-आलमला मार्गासह औसा मतदारसंघातील इतर प्रलंबित रस्ते सुधारणा कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी या बैठकीदरम्यान करण्यात आली. पालकमंत्री भोसले यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना दिल्या. या बैठकीमुळे औसा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विकासाचा ठोस रोडमॅप तयार होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## संक्षिप्त...

### राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष गंगाधरअप्पा अक्कानवरू यांना जिल्हाध्यक्षाकडून पदमुक्त तर तालुकाध्यक्षाकडून निलंबीत

**चाकूर :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षविरोधी काम केल्यामुळे राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष गंगाधरअप्पा अक्कानवरू यांचे पक्षातून निलंबन करण्यात आले आहे.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विरोधात जाहिर प्रचार व भाषणे करून पक्षविरोधी काम केले असल्याबाबतच्या लेखी तक्रारी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठीकडे दाखल केल्या होत्या. या तक्रारीची दखल घेऊन चौकशी होईपर्यंत अक्कानवनरू यांना जिल्हाध्यक्ष डॉ.अफसर शेख यांनी जिल्हा उपाध्यक्ष पदावरून पदमुक्त केले असतानाच तालुकाध्यक्ष शिव-ाजीराव काळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून निलंबित केले आहे.जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये पक्षविरोधी काम केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांचे पक्षातून निलंबन करण्यात आल्याचे पत्र राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे यांनी प्रसिद्ध केले आहे.एकाच दिवशी दोन्ही पत्राद्वारे अक्कानवरु यांच्यावर पक्षाकडून कारवाई करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलेच उधाण आले आहे.

### साकोळच्या ग्रामस्थांकडून गायकवाड यांचा भव्य सत्कार राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व स्वाभिमानी संघटनेचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित



**शिरूर अनंतपाळ :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हापरिषद साकोळ गटातुन राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे अधिकृत उमेदवार माणिक दौलतराव गायकवाड यांचा निवडणुकीत विजय झाल्यामुळे साकोळ ग्रामस्थांकडून जाहिर सत्कार करण्यात आला. साकोळ जिल्हापरिषद गटात सर्वाधिक मते घेऊन माणिक गायकवाड यांचा विजय झाल्यामुळे येथील जगत ज्योती महात्मा बस्वेश्र्वर चौकात राष्ट्रीय काँग्रेस पार्टीकडून व स्वाभीमानी शेतकरी संघटना तसेच गावातील नागरीकांकडुन गायकवाड यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील प्रतिष्ठित माजी उपसरपंच प्रदीप पाटील, यशवंत पाटील, मल्लिकार्जुन भूरे, संतोष महाजन,व्यंकट रावळे, भीमाशंकर भालके, शिवशंकर डोंगरे, बबन लुल्ले, चंदर कवठाळे,अशोक कोमारे, विजयकुमार मल्लाडे आदींसह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

### शारदा पॉलिटेक्निकला खो-खो स्पर्धेत प्रथम पारितोषिक

**निलंगा :** तालुक्यातील औराद शहाजानी शारदा पॉलिटेक्नीक कॉलेजच्या विद्यार्थिनीनी ग्रामीण पॉलिटेक्नीक कॉलेज, नांदेड येथे आयोजित इंटर इंजीनियरींग डिप्लोमा स्टुडंट स्पोर्ट्स असोसिएशन झोन टू खो खो क्रिडा स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले आहे. संघाच्या कर्णधार पसरगे प्रेरणा हिने उत्कष्ट नेतृत्व करून संघाला विजय मिळवून दिला. यात सहभागी हनमावाले धनश्री, बडुरे राणी, खुरपे रक्षीता, पवार प्रणीता, पवार रागीणी, पौळ पल्लवी, मठपती प्रतिभा, सावरे अंकिता, शिंदे निकीता, हानेगावे राधा, स्वामी वैष्णवी, शिंदे भक्ती, कल्याणी संस्कृती व बडुरे श्रद्धा यांचा सहभाग घेतला होता. यांना प्रा.सौ. राजेश्र्वरी अडेप्पा, प्रा.कु. दीक्षा सुरवसे, प्रा.रिजवा देशमुख व प्रा. आकाश मालदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे बस्वराज वलांडे, राजेश वलांडे, रमेशराव बगदुरे, पंकज बियाणी, शिवाजीराव जाधव प्राचार्य कळमासे संतोष बाबुराव आदींनी अभिनंदन केले.

### श्री धोंडूतात्या विद्यालयात स्वयंशासन दिन, सत्कार

**जळकोट :** जळकोट तालुक्यातील माळहिप्परगा येथील श्री धोंडूतात्या विद्यालयात स्वयंशासन दिन व विद्यार्थी सत्कार समारंभ पार पडला. स्वयंशासन दिना-चे मुख्याध्यापक वैभव केंद्रे व उपमुख्याद्यापिका अंजली काकरे व सर्व छात्र शिक्षकांचा संस्थेचे संचालक तथा सचिव बाबुराव जाधव व अध्यक्ष प्रा. प्रमोद जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे प्राचार्य एच व्ही. सूर्यवंशी हे उपस्थित होते. वर्गशिक्षक प्रा. प्रकाश वनशेट्टे यांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांसह प्रा. हंडरगुळीकर डी.एन., प्रा.एस.व्ही जाधव, प्रा. कोतवाडे एल.एम. यांच्यासह शाळेतील पर्यवेक्षक वाकळे आर. डी., सहशिक्षक व्ही. टी. केंद्रे, बी. एम. मालुसरे, प्रा गबाळे डी.व्ही., शिरसाट एम.ए., एम. एस. घाटे, डी.पी. मद्रे यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षाराणी कोंदळे व आभार जाधव राधिका हिने मानले.

### नवीन तंत्रज्ञानानुसार सर्वांना स्वतःला बदलावे लागेल- डॉ.बी. एस.सुरवसे

**उदगीर :** संशोधन हे जर्नलचा इनफॅक्ट किती आहे यानुसार न ठरता ते किती अभ्यासपूर्वक केलेले आहे यानुसार ठरते. आहे त्यापेक्षा एखाद्या अडचणीवर मार्ग काढणारे संशोधन हे यशस्वी ठरते. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानानुसार संशोधनात सर्वांना बदलावे लागेल असे उद्गार जैवशास्त्र संकुलाचे संचालक डॉ.बी.एस.सुरवसे यांनी काढले. छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात विज्ञान शाखेने आयोजित केलेल्या मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनातील उदयोन्मुख कल या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी.टी.शिंदे होते.तर प्रमुख उपस्थिती कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, कार्यकारणी सदस्य रामराव एकंबे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम.मांजरे, सिनेट सदस्य डॉ.विष्णू पवार यांची होती.

### भूकंपविषयक आपत्ती व्यवस्थापनाची १७ फेब्रुवारी रोजी रंगीत तालीम; नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

**लातूर, दि. १२ फेब्रुवारी :** भूकंपासारख्या आपत्तीच्या व्यवस्थापनासाठी करावयाच्या उपाययोजनांची रंगीत तालीम मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांनी यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती प्राधिकरणच्यावतीने करण्यात आले आहे.भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीत कशाप्रकारे प्रतिसाद द्यावा, काय करावे व काय करू नये, याबाबतची माहिती एनडीआरएफ पथकामार्फत यावेळी दिली जाणार आहे. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व शासकीय यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शोध व बचाव पथके यामध्ये सहभागी होणार आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापनातील महत्वाच्या बाबींची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

## मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर : डॉ.शेषनाथ भोसले

तभा वृत्तसेवा

**उदगीर, दि. १२ फेब्रुवारी :** क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान, शाश्वत ऊर्जा आणि नॅनोतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत मोठी क्रांती होत आहे.अत्याधुनिक संशोधनाचा वापर आधुनिक पद्धतीने झाला पाहिजे. मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही काळाची गरज आहे असे उद्गार केंद्रीय विद्यापीठ गुलबर्गा कर्नाटक येथील रसायनशास्त्राचे डॉ.शेषनाथ भोसले यांनी काढले. छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात विज्ञान शाखेने आयोजित केलेल्या मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनातील उदयोन्मुख कल या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रावेळी ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, उद्घाटक म्हणून स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ.राजाराम माने, प्रमुख उपस्थिती किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी टी शिंदे, सहसचिव हिरागिर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, डॉ.अंबादास कदम, डॉ. शिंदे एस.एल.,डॉ. सोनवणे आर. एस., पृथ्वीराज पाटील, पुंडलिकराव पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम.मांजरे, आयक्वेशीचे समन्वयक डॉ.विष्णू पवार यांची होती.

यावेळी विविध संशोधकाच्या शोधनिबंधाचे युनिव्हर्सल रिसर्च ॲनालिसिस जर्नल या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ.मांजरे यांनी महाविद्यालयाच्या उभारणीपासून आजपर्यंतचा इतिहास आणि महाविद्यालयाने ए प्लस ग्रेड घेतलेल्या सर्व घडामोडीचा वृत्तांत



मांडला.

पुढे बोलताना डॉ.भोसले म्हणा-ले, विद्यार्थ्यांनी मेहनत करावी. संशोधनामध्ये वेळ द्यावा. त्याशिवाय प्रगती होत नाही. तर उद्घाटक डॉ. राजाराम माने म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नवीन गोष्टी घेऊन आलेले आहे.अध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी या गोष्टी आव्हानात्मक आहेत. सर्वांनी अभ्यासपूर्वक त्याची अंमलबजावणी करावी. अध्यक्षीय समारोप अध्यक्षाच्या वतीने पृथ्वीराज पाटील यांनी केला. त्यावेळी ते म्हणाले,

सध्या विद्यार्थ्यांनी एआयचा वापर करावा. विद्यार्थ्यांचा कल जटील समस्या सोडवणे, नवीन साहित्य निर्मिती आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाद्वारे व्यावहारिक उपाय शोधण्यावर केंद्रित असावा असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.उर्मिला शिरसे, डॉ.व्ही.के.भालेराव यांनी तर प्रास्ताविक डॉ. एच.ए.तिरपुडे यांनी आणि आभार डॉ.विष्णू पवार यांनी मानले.

## वाहन चालकांना सुरक्षीततेच्या दृष्टीने मार्गदर्शन गरजेचे : सुनिल खंडागळे



तभा वृत्तसेवा

**वलांडी, दि. १२ फेब्रुवारी :** रस्ते सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यातील साखर कारखानदारीत नावलौकिक असलेल्या तळेगांव (भो.) ता. दे-वणी जि. लातूर येथील जागृती शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि., या कारखान्याचे गाळप हंगाम २०२५-२६ करीता ऊस वाहतुक करणारे ट्रक, मोठे ट्रॅक्टर-ट्रेलर व छोटे ट्रॅक्टर-ट्रेलर यांना रस्त्यावरील होणारे अप-घात टाळण्याच्या उद्देशाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर व जिल्हा रस्ता सुरक्षा समिती मार्फत ऊस वा-हतूक करणारे वाहनांना रिफ्लेक्टर बोर्ड चे मोफत वाटप करण्यात आले. तसेच वाहन चालकांना रस्त्यावरील होणारे अपघात, रस्ते सुरक्षिततेबाबत कारखाना व्यवस्थापनान व प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर चे मोटार वाहन निरिक्षक यांनी सविस्तर माहिती देवून मार्गदर्शन केले.

यावेळी शासनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूरचे सुनिल खंडागळे (मोटार वाहन निरिक्षक) व त्यांचे सहकारी श्री. मधुकर तिडके उपस्थित होते. तसेच कारखान्याचे जनरल मॅनेजर गणेश येवले, मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल वरदरेकर, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिरादार व रामदास सोळुंके, सुरक्षा अधिकारी रत्नकांत कुरवडे, कार्यालय अधीक्षक (शेती) राजकुमार कांबळे, केनयार्ड सुपरवाझर विशाल सांडूर यांच्यासह ऊस वाहतूक करणारे वाहन चालक, मालक व कारखान्याचे कृषी आणि सुरक्षा विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सामाजिक मूल्य व जनजागृतीत रासेयोचे योगदान मोलाचे - उपविभागीय अधिकारी शरद झाडके

तभा वृत्तसेवा

**औसा, दि. १२ फेब्रुवारी :** सामाजिक मूल्य व जनजागृतीत राष्ट्रीय सेवा योजनाचे योगद-ान मोलाचे असून विद्यार्थ्यांनी रासेयो निव-ासी शिबीराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकजीवन व त्यांच्या संस्कृतीशी आपली नाळ जोडावी असे प्रतिपादन निलंगा येथील उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहा-जनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबीर तालुक्यातील तांबरवाडी येथे दि.११ ते १७ फेब्रुवारी या कालावधीत संपन्न होत असून दि.११ फेब्रुवारी रोजी शरद झाडके यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदोपासक शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बगदुरे होते. व्यासपीठावर विशाल ढुमे (उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा), संस्थेचे उपाध्यक्ष राजेश वलांडे, तांबरवाडीच्या सरपंच लक्ष्मीबाई म्हेत्रे, उपसरपंच अमोल नवटके, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे, विवेक लादे, दत्ता पाटील, राजेश लातूरे इत्यादी उपस्थित होते.

पुढे बोलताना शरद झाडके यांनी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून आपल्या करिअर, ध्येय सिद्धीसोबतच समाजाच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावे. आपल्या आई-वडीलांच्या कष्टाची सदैव जाणीव ठेवावी. स्मार्ट मोबाईलच्या आभासी जगात अधिक वेळ न घालविता श्रमप्रतिष्ठा, आदर, माणूसकी, शिस्त, संस्कार, स्वावलंबन इत्यादी सद्गुणांची जोपासना करावी. आपल्या सुयोग्य व सुजाण आचरणातून समाजातील एक चांगला माणूस म्हणून आपली स्वतंत्र ओळख निर्माण झाली पाहिजे असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी विशाल ढुमे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप रमेश बगदुरे यांनी केले. याप्रसंगी जि.प.प्राथमिक शाळे-चे मुख्याध्यापक दयानंद मठपती यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिया मुल्ला यांनी केले. प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.विनोद जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.सुचिता किडीले यांनी मानले. प्रस्तुत शिबीर उद्घाटन कार्यक्रमास डॉ.सचिन हंचाटे, डॉ.प्रदीप पाटील, डॉ.आनंद मुसळे, डॉ.अशोक नारनवरे, डॉ.रितेश व्यास, डॉ.नागनाथ तेलंगे, डॉ.भगवान कदम, प्रा.बलभीम सातपुते, प्रा.आकांक्षा मुळे, प्रा.पल्लवी डोंगरगावे, प्रशांत मरगणे, सुरज कावाले, विलासराव बिरादार, रूपेश मोरे, राजेंद्र बेलुरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रा.से.यो. स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत डी.बी.कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्चला दमदार उपविजेतेपद; अभय धोत्रे ठरला सर्वोत्कृष्ट खेळाडू

तभा वृत्तसेवा

**चाकूर, दि. १२ फेब्रुवारी :**आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या वतीने आयोजित ता.११ फेब्रुवारी रोजी अकरावी राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यभरातील विविध महाविद्यालयीन संघाच्या सहभागाने रंगलेल्या या स्पर्धेत यजमान संघाने विजेतेपद पटकावले, तर डि.बी.कॉलेज ऑफ फार्मसी न्ड रिसर्च संघाने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. तृतीय क्रमांक डि. जी.पी.एस.फार्मसी कॉलेज,पथरी यांनी प्राप्त केला.अंतीम सामना खुप थर-ारक शेवटच्या क्षणापर्यंत चुरस पाहायला मिळाली.दुपारच्या सत्रात रंगलेल्या अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी जिद्द, शिस्त आणि उत्कृष्ट समन्वयाचे प्रदर्शन केले. पहिला सेट २५-२४ असा निसटता गमावल्यानंतर डी.बी. कॉलेजच्या खेळाडूंनी दुसऱ्या सेटमध्ये २५-२४ असा शानदार विजय मिळवत सामना निर्णायक टप्प्यावर नेला.अंतिम १५ गुणांच्या सेटमध्ये दोन्ही संघांत अक्षरशः श्र्वास रोखून धरणारी लढत पाहायला मिळाली. प्रत्येक गुणासाठी झालेली झुंज आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे सामना उत्कंठावर्धक ठरला. अखेर शेवटच्या क्षणी शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला संघाने १५-१३ असा विजय



मिळवत विजेतेपदावर मोहोर उमटवली.

अभय धोत्रे ठरला स्पर्धेचा मानकरी

या राज्यस्तरीय स्पर्धेत डी.बी. कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्चचा विद्यार्थी अभय धोत्रे याने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेचा मानकरी ठरला.आणी उत्कृष्ट खेळाडूचा किताब अभय धोत्रेनी पटकावला. त्याच्या सातत्यपूर्ण व प्रभावी खेळामुळे संघाला निर्णायक क्षणी बळ मिळाले. या यशामुळे महाविद्यालयाचा मान उंचावला असून विद्यार्थीवर्गात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

मार्गदर्शनाची भक्कम साथ

संघाला क्रीडा विभाग प्रमुख प्रा. शंतनू माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रशिक्षणामुळे संघाने राज्यस्तरावर दमदार उपस्थिती नोंदवली.

यशस्वी संघाचे व उत्कृष्ट खेळाडू अभय धोत्रेचे डी.बी. ग्रुपतर्फे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.या यशाबद्दल अध्यक्ष दिनेश बेंबडे, कार्याध्यक्ष विवेक बेंबडे, सचिव प्रणिता बेंबडे, विश्र्वस्त स्नेहा बेंबडे, संचालक डॉ. श्रीकांत ढगे मुख्याध्यापक शशिकांत चिल्लरगे डि .बी. पब्लिक स्कूल,प्रशासकीय अधिकारी श्रीहरी वेदपाठक, डॉ. जयदीप यादव तसेच डी.बी. ग्रुपमधील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संघ व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

# बचत गटांना बँकाकडून २६७ कोटी रूपयांचे अर्थसहाय्य वितरीत

## हिंगोलीत मिनी सरस प्रदर्शनीचे जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत जिल्ह्यात महिला बचत गटांची काम अतिशय वेगाने सुरू असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी मागील तीन वर्षात महिला बचत गटाला बँकांनी २६७ कोटी रूपयांचे अर्थसहाय्य केले आहे. यावर्षी ७० कोटी रूपयांचे उद्दीष्ट असून महिला बचत गटांनी या संधीचा लाभ घेवून जीवनमान उंचावण्यासाठी पुढे यावे असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

येथील जिल्हा परिषद बहुविध प्रशालेच्या मैदानावर दि १२ फेब्रुवारी रोजी महिला बचत गटाच्यावतीने मिनी सरस प्रदर्शनीचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या बचत गटांनी त्यांनी उत्पादीत केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचे स्टॉल लावले होते.

उद्घाटनपर भाषणात जिल्हाधिकारी म्हणाले की, महिलांना सक्षम बनविण्यासाठी शासनाने ही योजना काढली असून महिलांना तत्काळ आर्थिक सहाय्य मिळते. ज्या महिला बचत गटांना बँकाकडून अर्थसहाय्य मिळत नसेल किंवा काही अडचण निर्माण झाली तर त्यांनी थेट मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा आमच्याशी संपर्क साधावा आम्ही तत्काळ महिला बचत गटाची अडचण दूर करून त्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी प्रयत्न करू.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी महिला बचत गटाच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील अनेक स्त्रीया स्वावलंबी बनल्या असून त्यांचे जीवनमान बदलले असल्याची प्रतिक्रीया दिली. महिला बचत गटांनी आणलेल्या वस्तू तसेच इतर जीवनाश्यक वस्तू या त्यांच्या मेहनतीचे आणि कल्पकतेचे प्रतिबींब असून उत्कृष्ट असे काम महिला बचत गट करीत आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड, अप्पर पोलिस अधीक्षक मीना यांनी प्रदर्शनीतील स्टॉलला भेट देत महिला बचत गटांशी संवाद साधत त्यांचे कौतुक केले. यावेळी मान्यवरांनी दही-धपाटे आणि चहाचा आनंदही लुटला.

या प्रदर्शनीला नागरिकांनी अवश्य भेट देऊन महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी केले आहे.

# पोलिस भरतीमध्ये प्रथमच आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर

## धावण्याची अचूक वेळ नोंदविली जाणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्हा पोलिस दलात ६४ पदांच्या भरती प्रक्रियेला दि ११ फेब्रुवारीपासून सुरूवात झाली असून भरतीमध्ये प्रथमच आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून त्यामुळे धावण्याच्या चाचणीमध्ये उमेदवारांची अचूक वेळ नोंदविली जात आहे. पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन हे मैदानावर तळ ठोकून आहेत.

हिंगोली पोलिस दलाच्या ६४ पदांसाठी तब्बल १३२०० उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यानंतर दि ११ फेब्रुवारी पासून प्रत्यक्ष भरती प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपअधीक्षक राजकुमार केंद्रे, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांचे पथक भरती प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहे. उमेवारांच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर शारीरिक मोजमाप करण्यात येत आहे. त्यानंतर १६०० मीटर धावणे व गोळाफेक चाचणी घेतली जात आहे. जिल्हा पोलिस दलाची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वार करण्यात येत आहे.

याशिवाय मैदानात ४० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कॅमेऱ्याच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून भरती प्रक्रियेवर लक्ष ठेवले जात आहे. भरती प्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना मैदानावर मोबाईल घेवून येण्यास मनाइ करण्यात आली असून भरतीसाठी नियुक्त न केलेले पोलिस कर्मचारी मैदानाच्या परिसरात दिसल्यास त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी अशा स्पष्ट सूचना डॉ रोहन यांनी दिल्या आहेत. भरतीसाठी आलेल्या उमेदवारांना निवासासाठी पोलिस वसाहतीच्या कम्युनिटी हॉलमध्ये व्यवस्था करण्यात आली आहे तसेच त्या ठिकाणावरून उमेदवारांना संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर आणण्यासाठी पोलिस दलाकडून वाहतूक व्यवस्था देखील करण्यात आी आहे. मैदानावर आरोग्य पथक तैनात करण्यात आले आहे.

# हिंगोलीत पत्रकारांच्या गृहनिर्माणसाठी कोअर कमिटीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**



येथील मुख्यालयातील कार्यरत पत्रकारांच्या गृहनिर्माण करण्यासाठी पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या वतीने नुकतीच सर्वानुमते अकरा सदस्यीय कोअर कमेटी स्थापन केली आहे. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन गृहनिर्माण संदर्भात आदेशीत करण्याचे विनंती करण्यात येणार आहे.

पत्रकार वेलफेअर सोसायटी हिंगोली च्या वतीने जागा व घराच्या मागणीकरिता एनटीसी भागातील छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसरामध्ये नुकतीच बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पत्रकार वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष कल्याण हे प्रास्तावित संदीप नागरे यांनी केले. या बैठकीत पत्रकारांनी सुचना केल्या. सोसायटीचे अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी अध्यक्ष या नात्याने सर्व पत्रकारांपुढे चार ठराव मांडले. घरांच्या मागणीसाठी पुढील वाटचाली संदर्भात दिशा ठरविण्यात आली. यावेळी सर्वानुमते एक कोअर कमेटी स्थापन करण्यात आली. तसेच सर्वानुमते ठराव व कोअर कमेटी गठीत करण्यासाठी उपस्थितांची मंजुरी घेण्यात आली. या कोअर कमेटीमध्ये पत्रकार संतोष भिसे, राकेश भट्ट, इंद्रजित पाचमासे, विजय गुंडेकर, पल्लवी अटल, सुधाकर वाढवे, विकास जाधव, रवि शिखरे, प्रकाश इंगोले, संदीप उर्फ पिंटु नागरे, सुनिल पाठक यांची निवड सर्व सहमतीने करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व पत्रकारांच्या वतीने निवडीचे स्वागत करण्यात आले. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तातडीने भेट घेण्याचे व इतर ठराव संमत करण्यात आले. बैठकीचे सुत्रसंचालन प्रकाश इंगोले यांनी केले. यावेळी ऐंशी पत्रकार बांधव उपस्थित होते.



**हिंगोली- येथील भाजपच्या जिल्हा कार्यालयात पंडीत दीनदयाल उपाध्याय यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी पंडीत दीनदयाल यांच्या प्रतिमेस जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी माजी आ. रामराव वडकुते, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सरचिटणीस उमेश नागरे, माणिक लोडे, उमेश गुठ्ठे, विलास गोरे, पवन उपाध्याय, संजय खंडेलवाल, सदाशिव सुर्यतळ, सुनील शिंदे, विजय धायतडक आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शकुंतलादेवी ब्रिजलाल खुराणा यांचे निधन



हिंगोली- येथील शास्त्रीनगर भागातील ज्येष्ठ नागरिक श्रीमती शकुंतलादेवी ब्रिजलाल खुराणा यांचे दि ११ फेब्रुवारी रोजी त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. भाजपचे नेते स्व. ब्रिजलाल खुराणा यांच्या त्या पत्नी होत. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यात शकुंतलादेवी यांचा सहभाग होता. त्यांच्या जाण्यामुळे सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पश्चात राणा तिलकराज, जनकराज, ललीतराज, जगजीतराज, हंसराज ही चार मुले आणि डॉ मंजू नरेश गुलाटी असा मोठा परिवार आहे. दि १२ फेब्रुवारी रोजी त्यांच्या पार्थिवावर येथील डेंटल कॉलेजजवळ अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### ट्रॅफीक पोलिसांनी वाचविले अनोळखी इसमाचे प्राण



हिंगोली- महात्मा गांधी चौक येथे एक अनोळखी इसम अचानक खाली कोसळून बेशुद्ध अवस्थेत खाली पडला. त्या ठिकाणी बघ्याची गर्दी पाहून शहर वाहतूक शाखा येथील पेट्रोलिंग करीत असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर इसमाची तब्येत चिंताजनक असल्याचे पाहून पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब घुमनर, पोहेका गजानन राठोड, पोका संतोष घुगे, सुखदेव जाधव नंदकिशोर महाजन, विद्या भुजबळे यांनी त्यास तात्काळ सरकारी रुग्णालय हिंगोली येथे दाखल केल्याने सदर इसम नामे मधुकर वशिष्ठ राठोड रा चिंचोली यांना जीवनदान मिळाले आहे. त्यांचे नातेवाईक व मुलगा यांना फोन लावून त्या ठिकाणी बोलवून घेण्यात आले आहे. सदरील घटना व पोलिसांनी केलेले कर्तव्य यासाठी त्या ठिकाणी उपस्थित लोकांनी पोलिसांचे कौतुक केले आहे. पोलीस अधीक्षक डॉ निलाभ रोहन तसेच अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांचे मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे पोलिसांनी कर्तव्य पार पाडले आहे. त्याकरिता पोलीस निरीक्षक शरद मरे यांनी अधिकारी कर्मचारी यांचे कौतुक केले आहे.

### ६५ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- जिल्ह्यात अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६५ वाहन चालकांवर पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करीत वाहन चालकांकडून ४७ हजार १०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत अवैध दारू विक्री करणाऱ्या ५ ठिकाणी पथकांनी छापे मारून मुद्देमाल जप्त करीत आरोपींतावर गुन्हे दाखल केले आहेत. दोन ठिकाणी जुगार अड्ड्यावर धाड टाकून जुगाराचे साहित्य जप्त करीत गुन्हा दाखल केला आहे.

# हिंगोलीत तीन दिवशीय विधीनाट्य महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**



हिंगोली नगरीत राज्य शासनाच्या वतीने दि १४ ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विधीनाटय महोत्सव आयोजित करण्यात येणार असून या विधीनाटय महोत्सवात राज्यातील विविध भागातील लोककलावंत पारंपरिक लोककलांचे सादरीकरण करणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने राज्यामधील लोककलेचे जतन व संवर्धन व्हावे या दृष्टीने विविध लोककला महोत्सव तसेच कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. महाराष्ट्राला समृदध असा लोककलां व संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. या समृदध वारशाचे जतन व संवर्धन करण्याचे कार्य शासन विविध उपक्रमांच्या माध्यमातून करत आहे. राज्यातील दूर्मिळ होत चाललेल्या लोककलांना उर्जितवस्था प्राप्त होणे त्यांचा वारसा टिकविणे, या लोककलांना प्रोत्साहन देऊन या संस्कृतीविषयी अस्मिता वृध्दिंगत करणे या करीता दिनांक १४ ते १६ फेब्रुवारी २०२६ रोजी, दररोज सायंकाळी ६:३० वाजता कै. खा शिवाजीराव देशमुख सभागृह, राम लीला मैदान जवळ, बस स्टँड, हिंगोली या ठिकाणी विधीनाटय महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमात संबळ-हलगी जुगलबंदी, वासुदेव, गोंधळ, पोतराज, आराधी, दिमडी-चोंडक जुगलबंदी, जागरण गोंधळ, भारुड, वाघ्यामुरळी, डायका कथाकथन, गजनृत्य अशा लोककलांचे राज्यातील विविध कलाकारांच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. या महोत्सवातील तीनही दिवसीय कार्यक्रमांचा लाभ सर्व रसिक प्रेक्षकांनी घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने करण्यात येत आहे.

# महा पशुधन एक्स्पो २०२६ च्या लोगोचे गुप्ता यांचेहस्ते अनावरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**

राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत दि. १३ ते १५ फ ब्रुवारी दरम्यान परळी वैजनाथ (जि. बीड) येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ऐतिहासिक अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्स्पो-२०२६ या प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते झाले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

लोगो अनावरणप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे महा प्रदर्शन देशातील जातीवंत पशुधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम ठरणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांना दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, तरुण उद्योजक व शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनास मोठ्या संख्येने भेट देऊन उत्पन्न वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे यांनी या महा पशुधन एक्स्पोमध्ये राज्यातील तसेच राज्याबाहेरील जातीवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या तसेच विविध पक्ष्यांच्या प्रजातींचे दर्शन घडणार आहे. याशिवाय आधुनिक डेअरी फामिंग, चारा नियोजन, दुग्ध प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स उभारण्यात येणार असून पशुधनाचे आरोग्य, लसीकरण व वैज्ञानिक संगोपन या विषयांवर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

लोगो अनावरणानंतर संपूर्ण जिल्ह्यात प्रदर्शनाच्या व्यापक प्रसिद्धीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

# माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांची बाळासाहेब ठाकरे हरिद्रा केंद्राला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**



माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी हळद पीक व्यवस्थापनबाबत स्वतः तयार केलेल्या तंत्रज्ञानाबद्दल संशोधन केंद्रातील अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा केली. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून यावर्षीच्या प्रतिकूल हवामान परिस्थितीतही अतिशय निरोगी, जोमदार, कंदकुज विरहीत हळद पीक आल्याचे संशोधन केंद्र भेटी दरम्यान सांगितले.

मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र वसमत येथे माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी ९ फेब्रुवारी रोजी भेट दिली. या दरम्यान हळद संशोधन केंद्रातील लागवड केलेल्या लाकाडोंग, मेघा १, पी.डी.के.व्ही वायगाव, पितांबर, सुदर्शना, फुले स्वरूपा, फुले हरिद्रा यासह विविध हळद वाणाची सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच या हळद लागवडीसाठी खत, पाणी, यासह औषधी फवारणी च्या व्यवस्थापनाबद्दल चर्चा केली. मराठवाड्यासह इतरही जिल्ह्यात हळद लागवडीसाठी प्रमाणित शुद्ध हळद बेणे देत कमीत कमी खर्चामध्ये जास्तीत जास्त उत्पन्न काढण्यासंदर्भात शेतकऱ्यांना प्रगत करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले

विभागीय आयुक्त केंद्रेकर यांनी मागील काही वर्षांच्या अनुभवातून, निरीक्षणातून व अभ्यासातून हळद पिकासाठी व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसित केले व त्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून त्यांच्या शेतातील दर्जेदार, निरोगी हळद पिक वाढीच्या अवस्थेतील फोटो व व्हिडिओ दाखवले. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे व्यवस्थापन खर्चात मोठी बचत झाली असल्याचे सांगितले. तसेच हळद पिकात प्रत्येक झाडावर १६-२२ पाने होती व मे महिन्यात लागवड केलेल्या हळदीची पाने नोव्हेंबर महिन्यातही निरोगी व रोगमुक्त होती असे सांगितले.

हळद संशोधन केंद्रातील संकल्पचित्राद्वारे प्रस्तावित व सुरू असलेल्या कामांची सविस्तर माहिती जाणून घेतली. हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी होत असलेला हळद प्रकल्प हा निश्चितच शेतकऱ्याच्या उत्पन्न वाढीसाठी लाभदायक ठरणार आहे. याप्रसंगी हळद संशोधन केंद्राचे तंत्र अधिकारी रमेश देशमुख, कृषी अधिकारी शिवाजी राचेवाड, कृषी पर्यवेक्षक रमाकांत भुरे, तंत्र सहाय्यक पंकज कदम, दिपाली गायकवाड, सिताराम मुधळ, मारुती देमगुंडे यांची उपस्थिती होती.

# बारावी परीक्षा केंद्रांना जिल्हाधिकारींची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्ह्यात इयत्ता १२ वीच्या वार्षिक परीक्षेंतर्गत आज बुधवार, (दि. ११) रोजी सकाळच्या सत्रात हिंदी विषयाचा पेपर जिल्ह्यातील एकूण २६ परीक्षा केंद्रांवर शांततेत व सुरळीत पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या.

परीक्षेच्या पारदर्शक व सुयोग्य आयोजनासाठी विभागीय मंडळाने नियुक्त केलेल्या ५ भरारी पथकांनी जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली. तसेच मुख्य विषयांच्या परीक्षांसाठी २४ संवेदनशील परीक्षा केंद्रांवर स्वतंत्र भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर आवश्यक तो पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका ने-आण करणाऱ्या सहाय्यक परीरक्षकांसोबत पोलिस कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते.

# मराठवाड्यातील रेल्वे प्रश्नांवर केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी खा. डॉ. अजित गोपछडेंची सकारात्मक चर्चा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ फेब्रूवारी-**

मराठवाड्यातील रेल्वे विकासाला गती देण्याच्या दृष्टीने आणि रेल्वे प्रश्न मार्गी लावण्याचे अनुषंगाने खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्लीत भेट घेतली. नांदेड रेल्वे विभागांतर्गत असलेले रेल्वेच्या अनेक मागण्यांचे निवेदन खा. डॉ . गोपछडे यांनी रेल्वेमंत्र्यांना दिले. या सर्व मागण्या मान्य कण्यासाठी आपण सकारात्मक प्रयत्न करू असा विश्वास केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी दिला आहे. वंदे भारत एक्सप्रेसचे वेळापत्रक सुधारित करण्यात यावे , धर्माबाद रेल्वे स्थानकाचे नामकरण करण्यात यावे अशी मागणी ही खा. डॉ. गोपछडे यांनी यावेळी केली.



नांदेडमुंबई वंदे भारत एक्सप्रेसचे वेळापत्रक चुकीचे असल्याने प्रवाशांना योग्य सुविधा मिळत नाहीत. शिवाय रेल्वेचा वेग कमी असल्याने अधिकचा वेळ प्रवासात खर्च होत आहे. परिणामी प्रवाशांचा वेळ वाया जातो. मुंबईतील कामे करून परतण्यासाठी योग्य नियोजन होत नाही. ही बाब खा. डॉ .गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री वैष्णव यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे वंदे भारतच्या वेळापत्रकात बदल करण्याची आवश्यकता असल्याचेही खा. डॉ .गोपछडे यांनी यावेळी रेल्वेमंत्र्यांना सांगितले. वंदे भारतचा प्रवाशांना योग्य लाभ व्हावा यासाठी नांदेड येथून रेल्वे प्रस्थान वेळ पहाटे ५:०० ऐवजी ५:३० वाजता करावी आणि सुधारित वेळापत्रकानुसार मुंबईत दुपारी सुमारे १:०० वाजेपर्यंत सुनिश्चित करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

उमरी रेल्वे स्थानकावर नरसापूरनगरसोलसह चार महत्त्वाच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी करताना संत दासगणू महाराजांच्या समाधीस्थळाच्या निकटतेचा उल्लेख करण्यात आला. भाविक व प्रवाशांच्या सोयीसाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

याचबरोबर गोरठा गेट अंडरब्रिज क्र. १६४ ची जीर्ण अवस्था लक्षात घेता त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची गरजही अधोरेखित करण्यात आली.

गेल्या दशकभरात धर्माबाद स्थानकावर कोणत्याही नव्या एक्सप्रेस किंवा सुपरफास्ट गाडीला थांबा मंजूर झालेला नाही, याकडे लक्ष वेधण्यात आले. प्रादेशिक समतोल विकासाच्या दृष्टीने रामेश्वरम्ओखा, नांदेडसंबलपूर, नांदेडविशाखापट्टणम तसेच हैदराबादजयपूर या प्रमुख गाड्यांना थांबा देण्याची मागणी करण्यात आली.

नांदेड रेल्वे विभागात विद्युतीकरण पूर्ण झाल्यानंतरही मेमू कारशेडचा अभाव असल्याकडे लक्ष वेधून स्थानिक अनुरक्षण सुविधा उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. भविष्यातील औद्योगिक विस्तार व वाढत्या मालवाहतुकीचा विचार करता पूर्ण विकसित इलेक्ट्रिक लोकोशेडची स्थापना ही काळाची गरज असल्याचे खा. डॉ . गोपछडे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

या सर्व प्रस्तावांना मान्यता मिळाल्यास नांदेड रेल्वे विभागाला नवी गती प्राप्त होईल व मराठवाड्याच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीस ठोस अधिष्ठान मिळेल. असा विश्वास डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सर्व विषयांवर गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. ही भेट नांदेड परिसरातील रेल्वे विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व निर्णायक पाऊल ठरेल अशी माहिती खा. डॉ. गोपछडे यांनी दिली.

**धर्माबादचे नामकरण करावे**

धर्माबाद रेल्वे स्थानकाचे नामकरण प.पू. डॉ. केशव बळीराम हेडगेवार रेल्वे स्थानक असे करण्यात यावे अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली. धर्माबाद जवळ राष्ट्रीय चेतनेचे केंद्र असलेले कंदकुर्ती हे डॉ. हेडगेवार यांचे मूळ गाव असल्यामुळे त्यास राष्ट्रीय महत्त्व प्राप्त आहे. असेही डॉ. गोपछडे यांनी स्पष्ट केले. या नामकरणामुळे ऐतिहासिक गौरवाबरोबरच बासर - कंदकुर्ती संयुक्त धार्मिक पर्यटन व स्थानिक विकासालाही चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

# परमेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त महोत्सव

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १२ फेब्रूवारी-**

श्री क्षेत्र परमेश्वर मंदिर, वाढोणा-वारणावती-हिमायतनगर येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सवास येत्या १३ फेब्रुवारीपासून प्रारंभ होणार असून, एक मार्चला सांगता होणार आहे. या यात्रोत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यांना सुमारे १२ लाख ५१ हजार रुपयांच्या बक्षिसांचे वाटप केले जाणार आहे.



महाशिवरात्रोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे. १३ ते २० फेब्रुवारीदरम्यान रोज पहाटे पाचला काकडा भजन, सकाळी सात ते दहा ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी चार ते पाच प्रवचन, सायंकाळी सहा ते सात हरिपाठ आणि रात्री नऊ ते अकरा कीर्तन होणार आहेत. ज्ञानेश्वरी पारायणाचे मुख्य व्यासपीठ शिवाजी महाराज वडगावकर सांभाळणार आहेत. रविवारी (ता. १५) महाशिवरात्रीच्या दिवशी रात्री बारा ते तीन यावेळेत देवस्थान ट्रस्टचे पदसिद्ध अध्यक्ष तहसीलदारांच्या हस्ते श्री परमेश्वराचा अभिषेक, महापूजा व अलंकार सोहळा संपन्न होणार आहे, त्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले.

२१ फेब्रुवारी :शालेय बडबड गीत स्पर्धा, २२ फेब्रुवारी महिलांसाठी विविध स्पर्धा, २३ फेब्रुवारी लहान मुला-मुलीसाठी वेशभूषा स्पर्धा, राज्यस्तरीय लेझीम स्पर्धा, ४ फेब्रुवारी भव्य कबड्डी स्पर्धा, २५ फेब्रुवारी शालेय विविध गुणदर्शन स्पर्धा (सांस्कृतिक कार्यक्रम), २५ ते २७ फेब्रुवारी शंकरपट स्पर्धा, २६ फेब्रुवारी भव्य पशुप्रदर्शन व भजनस्पर्धा, २८ फेब्रुवारी कुस्त्यांची दंगल राहणार आहे. तसेच सर्व स्पर्धांसाठी मंदिर कमिटीने १२ लाख ५१ हजार रुपयांची तरतूद केली आहे. महोत्सवाचा समारोप रविवारी (ता. एक मार्च) परमेश्वर मंदिरात होणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर कमिटीचे उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ, सेक्रेटरी अनंतराव देवकते, विश्वस्त राजेश्वर

चिंतावार, प्रकाश कोमावार, श्यामसुंदर पवनेकर, विठ्ठलराव वानखेडे, प्रकाश शिंदे, राजाराम झरेवाड, वामनराव बनसोडे, लता पाध्ये, लता मुलंगे, माधवराव पाळजकर, मथुरा भोयर, शांतीलाल श्रीश्रीमाळ, अँड. दिलीप राठोड, अनिल मादसवार, संजय माने, विलास वानखेडे, गजानन मुतलवाड आदींनी केले आहे.

## डॉ. आंबेडकर पुतळा परिसराचे सुशोभीकरण करा; समाज बांधव

**मुदखेड** -मुदखेड शहरात गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी प्रलंबित आहे. या नियोजित जागेचे तातडीने सुशोभीकरण करावे, यासह दलित वस्तीमधील विकासकामांच्या चौकशीसाठी मुदखेड बौद्ध समाजाच्या



वतीने नगरपालिकेचे मुख्याधिकारी व नवनिर्वाचित नगराध्यक्षांना, उपनगराध्यक्ष यांना दि.९ फेब्रुवारी रोजी निवेदन देण्यात आले. या भागाच्या प्रस्थापित नेत्यांनी आजवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा वापर केवळ राजकारणासाठी केला. मात्र, नियोजित जागेवर पुतळा उभारणे तर दूरच, साधे सुशोभीकरण देखील करण्यात आलेले नाही. शहरात एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नियोजित पुतळा स्मारकाचे सुशोभीकरण वेगात सुरू असताना, महामानवाच्या स्मारकाबाबत दुजाभाव का? असा सवाल युवक व समाज बांधवांनी उपस्थित केला आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळा जागेचे काम तातडीने हाती घ्यावे. भिमनगर येथील बौद्ध विहाराचे प्रलंबित काम युद्धपातळीवर पूर्ण करावे.,दलित वस्तीमधील स्मशानभूमी रस्ते, शौचालये, आणि अशोकनगर येथील सी.सी. रोडचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, या कामांची तातडीने चौकशी करण्यात यावी, चिखलवाडी येथील सी.सी. रोड व नालीचे काम निकृष्ट होत असून त्यावर कारवाई करावी.आसे निवेदन देण्यात आले.यावेळी मुदखेड शहरातील बौद्ध समाजातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हदगाव पश्चिम मंडळात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन

**हदगाव**-भारतीय जनता पार्टी हदगाव पश्चिम मंडळातर्फे बामणी फाटा, ता.हदगाव येथे भारतीय जनसंघाचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'समर्पण दिन' साजरा करण्यात



आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून नांदेड जिल्हा सरचिटणीस सौ. मंगाराणी अंबुलगेकर उपस्थित होत्या. यावेळी खालील विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार त्यांच्या अंत्योदय आणि एकात्म मानववादाच्या विचारांची आजच्या काळात असलेली गरज. केंद्रीय अर्थसंकल्प केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केलेल्या निधी अंतर्गत लोककल्याणकारी योजना आणि सर्वसामान्यांसाठी असलेल्या संधींची माहिती उपस्थितांना देण्यात आली. यावेळी तुकाराम चव्हाण, प्रमोद मामीडवार, चंद्रशेखर पाटील ,व्यंकटेश लोणे, सूर्यकांत हनवते (मंडळाध्यक्ष, पश्चिम), डॉ. भगवान निळे (कार्यक्रम आयोजक), सविताताई लोणे, लताताई फाळके, श्री. देशमुख, गणेश हंबर्डे, विठ्ठल मस्के, अशोक जाधव, शेषराव मुलगीर, अरुण पाटील चव्हाण , डॉ. वाकोडे, गजानन झुरोळ आणि परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व व्यापारी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुदानापासून वंचित लाभार्थ्यांच्या तक्रारींचे कॅम्पमध्ये निराकरण

**माहूर**-माहूरच्या तहसील कार्यालयात मंगळवार दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी मागील दोन ते तीन वर्षाचे अनुदान लाभार्थी यांना मिळाले नसल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार अभिजीत जगताप, नायब तहसीलदार कैलास जेठे यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष कॅम्प घेण्यात आला. सदर कॅम्पमध्ये उपस्थित २१० लाभार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात आले. यामध्ये २१० लाभार्थ्यांपैकी १५० लाभार्थी यांचे पेमेंट स्टेटस हे सक्सेसफुल होते, मात्र लाभार्थी यांना ते कोणत्या बँक खात्यावर जमा झाले हे माहित नसल्याने त्यांना अनुदान कोणत्या खात्यावर जमा झाले हे या कॅम्पमध्ये सांगण्यात आले. तालुक्यातील ५१ लाभार्थ्यांच्या सन २०२२, २०२३, २०२४ व २०२५ या वर्षाच्या अनुदानासंबंधी तक्रारी होत्या. सदर तक्रारी पैकी तहसील स्तरावरील तक्रारींचे तात्काळ निरसन करण्यात आले,तर ०३ तक्रारींमध्ये ई-केवायसी झाली परंतु अनुदान जमा झाले नाही. त्यामध्ये ई-पंचनामा पोर्टलवर पाठपुरावा करण्यात येणार आहे. याच कॅम्पमध्ये १० ई-केवायसी प्रलंबित लाभार्थ्यांचे ई-केवायसी देखील करण्यात आले व ०३ लाभार्थ्यांच्या ग्रिव्हन्स दाखल करण्यात आल्या आहेत. सदरील कॅम्पमध्ये अनुदानासंबंधी प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचा अनुदान खात्यात पडेपर्यंत पाठपुरावा करण्यात येईल, असे नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी सांगितले.तकॅम्पच्या यशस्वीतेसाठी तहसीलदार अभिजीत जगताप, कैलास जेठे नायब तहसीलदार नैसर्गिक आपत्ती विभाग, सहायक महसूल अधिकारी नैसर्गिक आपत्ती विभाग सिध्दार्थ कुलदिपके, सर्व मंडळ अधिकारी, संबंधित सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी, तहसील कार्यालयातील कर्मचारी, शिपाई यांनी परीश्रम घेतले.

# बिलोली शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही : बालाजी खतगावकर

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ११ फेब्रूवारी-**

बिलोली शहराच्या प्रलंबित विकासकामा संदर्भात मंत्रालयात पाठपुरावा करून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी बिलोली नगर परिषदेत सदिच्छा भेटी दरम्यान दिली आहे.



बिलोली तालुक्याचे भूमिपुत्र व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर हे कांही खाजगी कामानिमित्त बिलोली तालुक्यात आले असता त्यांनी नगर परिषदेस सदिच्छा भेट दिली. नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी शहराच्या विविध विकासकामा संदर्भात चर्चा केली असता खतगावकर यांनी विकासकामा संबंधित प्रशासकीय कामाचा पाठपुरावा करून शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही दिली. यावेळी नगर परिषदेचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, उपनगराध्यक्ष अनुप अंकुशकर,गटनेता नागनाथ तुम्मोड, नगरसेवक यशवंत गादगे, नगरसेवक उमेश बिलोलीकर यांनी बालाजी पाटील यांचा यथोचित सत्कार केला. या प्रसंगी माजी उपाध्यक्ष मारोती पटाईत, माजी नगराध्यक्ष विजय कुंचनवार, गंगाधर शिंदे, नगरसेवक शिवाजी गायकवाड, महेंद्र गायकवाड, राजू कुडके, डॉ. मनोज शंखपाळे, अब्दुल फिरदोस, वासिम बेग इनामदार, सादिक पटेल, अर्जुन खंडेराय,मुकिंदर कुडके, बाबा नाईकवाडी, रितेश अडबे यांच्या अनेक जण उपस्थित होते.

# राज्यात ११ अप्पर जिल्हाधिकारी पदांना मंजुरी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १२ फेब्रूवारी-**

राज्यातील वाढते भौगोलिक क्षेत्र, लोकसंख्या आणि शासकीय कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेता राज्य मंत्रिमंडळाने ११ नव्या अप्पर जिल्हाधिकारी पदांच्या निर्मितीस मंजुरी दिली आहे. महसूल व वन विभागाच्या प्रस्तावानुसार ही पदनिर्मिती करण्यात येणार असून, नागरिकांना शासकीय सेवा अधिक जलद व सुलभपणे उपलब्ध करून देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.



उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार जिल्ह्यांचे क्षेत्रफळ, लोकसंख्या, आदिवासी व दुर्गम भागांची संख्या तसेच जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर या निकषांच्या आधारे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. संबंधित विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून ३० जानेवारी २०२६ पर्यंत सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**कामकाजाचा वाढता ताण लक्षात घेऊन निर्णय**

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी प्रस्तावित तालुक्यांची संख्या, लोकसंख्या, क्षेत्रफळ, दुर्गम व आदिवासी भागांची स्थिती, जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावरील महसूल आणि अर्धन्यायिक कामांचा ताण या बाबींचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. जमाबंदी, गौणखनिज प्रकरणे, जमीन सुधार कायदे, कमाल जमीनधारणा, कुळवहिवाट आणि आदिवासींना जमीन परतवाटप यांसारख्या प्रकरणांमुळे सध्या प्रशासनावर मोठा भार आहे.

**६९ अप्पर तहसील कार्यालयांचा प्रस्ताव**

राज्यात ६९ अप्पर तहसील कार्यालये सुरू करण्याचाही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. महसूल मंडळांची संख्या, महसुली गावे, लोकसंख्या, दुर्गम भाग, तालुका मुख्यालयापासूनचे अंतर तसेच दाखले व अर्धन्यायिक प्रकरणांमुळे वाढलेला ताण या निकषांवर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

**किनवट व इस्लापूरला दिलासा**

नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय प्रस्तावित असून, इस्लापूर येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. किनवटचा मोठा भौगोलिक विस्तार आणि आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांची गैरसोय लक्षात घेता हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

आमदार भीमराव केराम यांनी या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले. किनवटला अप्पर जिल्हाधिकारी व इस्लापूरला अप्पर तहसील कार्यालय प्रस्तावित झाल्याने स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. मांडवी तालुका निर्मितीसाठीही प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शासनाकडून सर्व प्रस्तावांचे एकत्रित परीक्षण करून अंतिम मुख्यालय निश्चित केले जाणार असून, नकाशासह स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे प्रशासन अधिक गतिमान होऊन नागरिकांचा वेळ व खर्च वाचणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दक्षिण मतदार संघात विकास कामांचे भूमिपूजन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ फेब्रूवारी-**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत विविध विकासकामांसाठी मंत्री हेमंत पाटील व आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या प्रयत्नातून दिलेल्या निधीच्या कामाचे भूमिपूजन दिनांक १२ फेब्रुवारी रोजी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर व मंत्री विधान परिषद गटनेते तथा आमदार हेमंत पाटील व दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी दक्षिण विधानसभा मतदारसंघातील त्रिकुट येथील गणपती मंदिर परिसरास सुशोभीकरणासाठी ४६ लक्ष रुपये निधीचे भूमिपूजन तसेच गाडेगाव येथील जोड रस्त्याचे दुरुस्ती करण्यासाठी २८९ लाख रुपयाच्या निधी देण्यात आला असून याचेही भूमिपूजन करण्यात आले. तसेच सिद्धनाथ मंदिर येथील शिवानंद स्वामी महाराज मठ परिसरातील सुशोभीकरणासाठी ४९ लक्ष निधी देण्यात आला. त्याचबरोबर तुपा येथील तुपा ते चंदासिंग कॉर्नर अंतर्गत रस्ता सीसी रोड करण्यासाठी १९७ लक्ष रुपये येवडा निधी देऊन काम पूर्ण झाल्याने या रस्त्याच्या शुभारंभ दिनांक १२ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तुळशी यादव, उद्धव पाटील शिंदे, विनय गिरडे, बाळू पाटील मोरे, सुहास खराणे, बालाजी पाटील भायेगावकर, शिवाजी कदम, सुधीन बागल यांच्यासह समस्त गावकरी मंडळी उपस्थित होती.

# आदर्श विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात; चिमुकल्यांच्या सादरीकरणाने रंगली शाळा

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १२ फेब्रूवारी-**

देगलूर येथील आदर्श विद्यालय प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी चिमुकल्यांनी सादर केलेल्या रंगतदार नृत्यप्रदर्शनांनी व विविध कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विद्यालयात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या परिसरात पालक, माता-पिता आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या संचालिका गायकवाड मॅडम, पोलीस निरीक्षक मारुती मुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी, केंद्रप्रमुख कुराडे मॅडम आणि सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी मन्यार सर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. शाळा प्रशासनाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यानंतर चिमुकल्यांच्या नृत्यप्रदर्शनास सुरुवात झाली.



स्वतःचे नावही स्पष्टपणे सांगू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांनी विविध बहारदार गीतांवर अप्रतिम नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच छोट्या नाटिका आणि विनोदी चुटकुल्यांद्वारे सामाजिक व भौतिक परिस्थितीचे प्रभावी चित्रण करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टिपराळे सर यांनी समर्थपणे केले. यावेळी संस्थेचे सचिव गायकवाड मॅडम, मुख्याध्यापक अंबाटे सर, टिपराळे सर, मुख्याध्यापिका कांबळे मॅडम, सहशिक्षक पांचारे सर, मुख्याध्यापक बिरादार सर, राजश्री शाहू विद्यालयाचे मुख्याध्यापक जाधव सर, बोडके सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक श्रीनिवास अंबाटे, सातारे, वझरकर, सोनकांबळे, मनियार मॅडम, शेख आणि सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक श्रीनिवास अंबाटे यांनी उपस्थित पत्रकार, पालक आणि मान्यवरांचे आभार मानत विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. एकूणच, आदर्श विद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या कलागुणांची झलक दाखवणारा आणि पालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा संस्मरणीय सोहळा ठरला.

# जिल्ह्यात १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ फेब्रूवारी-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्यातर्फे १४ मार्च २०२६ रोजी जिल्हा न्यायालय नांदेड व जिल्हयातील सर्व तालुका न्यायालय येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, धनादेश अनादरीत झाल्याबाबत प्रकरणे तसेच कौटूंबिक न्यायालयातील तडजोड होण्यायोग्य प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण मंच, सहकार न्यायालय व कामगार न्यायालयातील प्रकरणे ईत्यादी तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

याशिवाय सदर लोक अदालतीत दाखलपूर्व प्रकरणे जसे थकीत मालमत्ता कर, थकीत विद्युत बिल, थकीत टेलीफोन बिल, विविध बॅकांचे कर्ज वसुली प्रकरणे, थकीत पाणीबिल ईत्यादी प्रकरणे तडजोडीव्दारे निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये झालेल्या निवाडयाविरूद्ध अपील नाही. प्रलंबित प्रकरणात भरलेली कोर्ट फीची रक्कम १०० टक्के परत मिळते. नातेसंबधात कटुता निर्माण होत नाही अशा प्रकारे लोक न्यायालयाच्या माध्यमातुन सुलभ, जलद व मोफत न्याय मिळतो. तरी सदर राष्ट्रीय लोकअदालतीत मोठया संख्येने प्रकरणात तडजोड होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे यांनी केले आहे.

तसेच सर्व पक्षकारांना कळविण्यात येते की, त्यांनी तडजोडीसाठी येताना आपले अधिकृत ओळखपत्र सोबत घेवून यावे. तरी सर्व संबंधित पक्षकारांनी दिनांक १४ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा.

**जाहीर प्रगटन !!**
**तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात इ.कि. फौ. अर्ज.क्र./२०२५**

श्री श्रीमती संदीप मारोती आकमवाड
विरुध्द
ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बितनाळ ता. उमरी, जि. नांदेड.
प्रकरण - जन्म/मृत्यू (जनम) नोंद घेणे बाबत.

ज्याअर्थी रार्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे संदीप मारोती आकमवाड रा बितनाळ ता.उमरी जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/ मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारी शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये दिनांक ०९/०९/२०२५ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि. फौ. अर्ज दि. // रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांची भाची श्रद्धा रामेश्वर क्यातमवाड यांचा जन्म दिनांक २५/०९/२०१० रोजी झाल्याची नोंद मौ.बितनाळ ता.उमरी जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक-२३/०१/२०२६
स्थळ - उमरी

तहसिलदार उमरी




**बीड : आज दास प्रभू महाराज दादा महाराज यांच्या आशीर्वादाने व लक्ष्मीकांत आयुर्वेदिक औषधालय , दास एजन्सी चे शुभारंभ आज संपन्न झाला यावेळी के एस के मेडिकल कॉलेज प्रिन्सिपल डॉक्टर श्री महेंद्र गोशाल यांच्या हस्ते व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते शुभारंभ झाला, यावेळी नगरसेवक श्री अमर नाईकवाडे,डॉक्टर विजय इंगळे साहेब, आसाराम शेठ चांडक, अनिल शेठ चरखा, वैजनाथराव दळवे, बाळासाहेब उबाळे पाटील, एस आर डोरमारे सर, पी एस जोशी सर, एकनाथ टेपाळे, विजय देशमुख, प्रशांत देशमुख, डॉक्टर आयुष्य चरखा, एम आय जिल्हाध्यक्ष शेख शफिक, जगदीश जोशी, संजय माअंकुश, श्री मालू शेठ, सम दरिया सेठ, सुरेश राव बनसोडे.**

# परळीतील ऐतिहासिक महापशूधन एक्स्पोचे शुक्रवारी ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते उद्घाटन ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १५ ऐवजी १४ तारखेला येणार

### पशू प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात; एक हजाराहून अधिक विविध पशूंचा सहभाग, बीडसह राज्यातील पशू पालकांनी प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा**

परळी वैजनाथ, दि. ११...

प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक व भव्य असे राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्स्पो पहिल्यांदाच भरत आहे. या पशू प्रदर्शनाचे उद्धाटन शुक्रवारी ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवार १४ तारखेला परळीत येणार आहेत.

शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू सहभागी होणार असून प्रदर्शनाच्या जय्यत तयारीला सध्या वेग आला आहे. शुक्रवारी १३ तारखेला सकाळी ११ वा. प्रदर्शनाचे उद्धाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

**मुख्यमंत्री १५ ऐवजी १४ तारखेला परळीत येणार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निमंत्रण पत्रिकेनुसार प्रदर्शनाच्या समारोपाला म्हणजे रविवारी १५ तारखेला येणार होते परंतु ते आता शनिवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. शहरात येणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**हा अत्यंत सुंदर योगायोग**

महाशिवरात्र आणि महा पशुधन एक्सपो हा अत्यंत सुंदर योगायोग आहे. या खात्याची मंत्री म्हणून परळीत असे प्रदर्शन व्हावे अशी माझी इच्छा होती.

नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ना. पंकजाताई यांनी केले

**पशुप्रदर्शन ऐतिहासिक**

या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळणार आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे.

## शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून एसटी बसेसला दिल्या नवीन डिजिटल पाट्या

बीड दि.११(प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील पिंपळनेर पत्रकार संघ व सामाजिक कार्यकर्त्यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारातील एसटी महामंडळाच्या अनेक एसटी बसेस वर लावण्यात येणाऱ्या गावाच्या नावांच्या पाट्या जीर्ण झाल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट यांनी नवीन डिजिटल गावाच्या नावांच्या पाट्या तयार करून एसटी प्रशासनाला भेट दिल्या. शिवप्रसाद सिरसाठ यांनी हाती घेतलेल्या या नवीन उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीड आगारातून बीड- ईट- पिंपळनेर- नाथापूर, बीड- ईट- पिंपळनेर- नाथापूर- रांजणगाव, बीड-ईट-आडगाव आदी ग्रामीण भागात धावणाऱ्या अनेक एसटी बसेसना स्पष्ट बोर्ड नसल्याने प्रवाशांना वारंवार एसटी बस चालक व वाहकांना विचारणा करावी लागत आहे. यामुळे एसटी बस चालक- वाहकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच अनेकदा बोर्ड नसल्यामुळे किंवा न दिल्याने बस जवळून गेली तरी प्रवाशांना ती ओळखता येत नव्हती. ही बाब पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारासाठी नवीन डिजिटल पाट्या तयार करून बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी या पाट्या सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्या हस्ते बीड आगाराच्या वाहतूक नियंत्रक श्रीमती आयेशा शेख व वाहतूक नियंत्रक महेश भावसार यांच्याकडे सुपूर्त केल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, संपादक तथा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. आत्माराम वाव्हळकर, पत्रकार प्रज्वल सिरसाट, सातपुते तसेच एसटी आगारातील कर्मचारी, बस चालक, वाहक आणि प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना बस ओळखणे सोपे होणार असून शिवप्रसाद सिरसाट यांच्या या स्तूत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# गेवराई नगर परिषदेच्या विषय समित्यांवर सात नगरसेवकांना संधी



**अॅड. राक्षसभुवनकर , रेवती घुंबार्डे, महेश सौंदरमल, शेख शहेदाद, प्रशांत राख, आशिया शफियोद्दीन, आणि सोनाली सुतार यांना स्वीकारला पदभार**

**तभा वृत्तसेवा**

गेवराई दि. १२ : वार्ताहर : गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या विशेष सभेत विषय समित्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या असून, ज्येष्ठ नगरसेवक अॅड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, उपनगराध्यक्ष रेवतीताई भगवान घुंबार्डे यांना पाणी पुरवठा विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. शेख शहेदाद यांना नियोजन व विकास, महेश सौंदरमल यांच्याकडे शिक्षण व सांस्कृतिक विभाग, आसिया शफियोद्दीन सय्यद यांना महिला व बालकल्याण समितीचे सभापती करण्यात आले असून, याच विभागाच्या उपसभापती म्हणून कु. सोनाली सुभाष सुतार यांची निवड करण्यात आली आहे. स्वच्छता विभागाची जबाबदारी प्रशांत राख यांना दिली आहे. निवड झालेल्या सर्व सभापती, उपसभापतींचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

नगराध्यक्षा गिताभाभी बाळराजे पवार यांच्या उपस्थितीत, २८ जाने. २०२६ रोजी सकाळी अकरा वाजता झालेल्या विशेष सभेत रोहयो चे उपजिल्हाधिकारी श्री. मुळ यांना सदरील निवडी जाहीर केल्या आहेत.

पाचजणांची विषय समित्यांवर निवड करण्यात आली आहे. यामध्ये, ज्येष्ठ नगरसेवक अॅड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, उपनगराध्यक्ष रेवतीताई भगवान घुंबार्डे यांना पाणी पुरवठा विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. शेख शहेदाद यांना नियोजन व विकास, महेश सौंदरमल यांच्याकडे शिक्षण व सांस्कृतिक विभाग, आसिया शफियोद्दीन सय्यद यांना महिला व बालकल्याण समितीचे सभापती करण्यात आले असून, याच विभागाच्या उपसभापती म्हणून कु. सोनाली सुभाष सुतार यांची निवड करण्यात आली आहे. स्वच्छता विभागाची जबाबदारी प्रशांत राख यांना देण्यात आली असून, निवड झालेल्या सर्व सभापती, उपसभापतींचे नवनिर्वाचित नगराध्यक्षा गिता बाळराजे पवार यांनी सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. यावेळी सर्व नगरसेवक, नगरसेविका, नपचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके व सर्व नप कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## गुजर समाजाच्या वतीने मंजरीकर महाराजांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

बीड : गुजर समाजाचे कैवल्यमूर्ती हरिभक्त पारायण माऊली महाराज मंजरीकर यांच्या ७२ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त गुजर समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी सुनील गुजर यांनी महाराजांच्या कार्याचा गौरव करत समाजाला त्यांच्या मार्गदर्शनाची गरज असल्याचे सांगितले.

जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महाराजांनी भगवी पताका खांद्यावर घेऊन समाजप्रबोधन, प्रवचन आणि योग्य मार्गदर्शनाचे महान कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजाला दिशा मिळाली असून ९० टक्के समाज परमार्थाकडे वळला आहे. तसेच त्यांच्या प्रेरणेने सुमारे ५०० युवक शासकीय सेवेत कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढेही महाराजांचा सहवास लाभावा, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ, अखिल भारतीय देव सेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, कृषी सहाय्यक सुनील बहिरवाळ, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजाभाऊ गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, शहराध्यक्ष हनुमान बहिरवाळ, माजी सरपंच अर्जुन बहिरवाळ, भाजप युवा नेते राम बहिरवाळ, सखाराम नेहराळे, अशोक बहिरवाळ, किशोर जोगदंड यांसह समाजबांधव उपस्थित होते.

# नेकनूर - सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी;दोघे ताब्यात

## नेकनूर पोलिसांच्या कारवाईत पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**

नेकनूर -- नेकनूर पोलिसांना गांजा तस्करीचे रॅकेट उघडकीस आणण्यात यश मिळाले आहे. सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी कांहीं जण करत असल्याची गुप्त माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांना मिळाली. त्यांनी माहिती मिळताच तात्काळ कारवाई करत एका शेतात छापा मारुन फर्दाफ़ाश केला.या कारवाईत तीन लाखांचा गांजा जप्त करत दोघांना ताब्यात घेण्यात यश मिळवले.

नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील हिंगणी बुद्रुक येथील एका उसाच्या शेतात सिमेंटच्या गोणीत गांज्या भरून ठेवण्यात आला होता. याची माहिती नेकनूर पोलिसांना झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व त्यांच्या टीमने छापा मारला.यावेळी शेतात दोन सिमेंटच्या गोणीत ११ किलो १५० ग्रॅम गांज्या पोलिसांना सापडला.याची किंमत २ लाख ७८ हजार ७५० रुपये इतकी आहे

या गांज्याची तस्करी होणार असतानाच पोलिसांनी गुमानसिंग शिवराम पावरा वय-३५ वर्ष,रा. बोरमल्ली पाडा,ता.शिरपूर,जि.धुळे व मनोज सीताराम मेहता वय१९वर्ष, रा.बाखरली, ता.वरला, जि.बडवानी राज्य. मध्यप्रदेश या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. नेकनूर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आहेर हे करीत आहेत.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयात स्व. डॉ. मदनराव काळे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**



बीड (प्रतिनिधी) : श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक/माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल, तेलगाव रोड, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. मदनराव काळे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. डॉ. मदनराव काळे यांच्या प्रतिमेस श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, सचिव प्रा. जे. पी. शेळके,संचालक प्रा.ए.आर. डंबरे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम, मुख्याध्यापक आर. टी. राऊत व प्राचार्या आर. डी. लोखंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी स्व. डॉ. मदनराव काळे यांच्या कार्याचा व व्यक्तिमत्त्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. शाळेतील सहशिक्षक श्री. एस. सी. जगताप यांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला.

मराठवाड्यातील सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ म्हणून त्यांची ओळख होती. बीड जिल्ह्यात प्रभावी नेतृत्व निर्माण करणारे ते पहिले व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे मूळ गाव देपेगाव, ता. माजलगाव, जि. बीड हे होय.स्व. डॉ. मदनराव काळे हे एक ख्यातनाम नेत्ररोग तज्ज्ञ होते. शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. गोरगरीब रुग्णांकडून त्यांनी कधीही फी घेतली नाही. निस्वार्थ भावनेने त्यांनी गरजूंना नेत्रोपचार व औषधोपचार करून समाजसेवा केली. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## चंद्रकांत गणगे यांचे निधन

बीड। प्रतिनिधी

शहरातील पांगरी रोड परिसरातील विश्वास नगर येथील रहिवासी चंद्रकांत गणगे यांचे मंगळवारी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५२ वर्षे होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात शोककळा पसरली. चंद्रकांत गणगे हे मनमिळावू व शांत स्वभावाचे म्हणून परिचित होते. सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांमध्ये ते नेहमी सक्रिय सहभाग घेत असत. परिसरातील नागरिकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबियांसह मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ व बहीण असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल विश्वास नगर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**



अंबड : कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयाच्या शिशु वाटिका ते दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल ही मातोश्री कृषी पर्यटन लालवाडी, अंबड या ठिकाणी आयोजन करण्यात आली होती.शैक्षणिक सहल हा शालेय अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग आहे, जो विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर प्रत्यक्ष अनुभव, ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक ज्ञानाची व्यावहारिक ओळख करून देतो। हे सहली मनोरंजनासह सामाजिक विकास, गटभावना आणि नवीन वातावरणाशी जुळवून घेण्याची कौशल्ये विकसित करतात। यात ऐतिहासिक स्थळे, विज्ञान केंद्रे, कृषी पर्यटन आणि संग्रहालयांना भेटी समाविष्ट असतात.

त्याप्रसंगी सर्वप्रथम सहलीसाठी शुभेच्छा देण्याकरिता शालेय व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री.वेंकटेशजी गोसावी सर तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक मा.श्री.प्रदीप जोशी सर व सर्व पालकवर्ग उपस्थित होते. विद्यार्थ्यांना स्कूलबस च्या साह्याने मातोश्री कृषी पर्यटन लालवाडी या ठिकाणी घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शिशुवाटिका ते दुसरीपर्यंत ६० विद्यार्थी व सहा शिक्षकवृदानी सहभाग घेतला होता.

सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी मिसळपाव नाश्ता केला. त्यानंतर प्रत्येक गटानुसार विभागणी करण्यात आली. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी जम्पिंगझपान. घसरगुंडी, सिस्वा, झोका, रेन डान्स, स्विमिंग बारा बलुतेदार यांची माहिती, विविध गड किल्ल्यांची माहिती, भुयार, बैलगाडी, हेलिकॉप्टर, विविध पॅलेसचे दरवाजे, इत्यादी साहित्यसंग्रह तसेच नैसर्गिक वातावरणामध्ये विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. त्यानंतर जेवणाचा भरपूर आस्वाद घेतला. या सहलीसाठी शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री प्रदीप जोशी सर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री. अनिल चव्हाण सर सहल प्रमुख शिशुवाटिका प्रमुख श्रीम. प्रणिताताई वाघमारे तसेच या सहलीमध्ये सहभागी श्रीम.रागिनी जोशी, योगेश दातीर, कल्पना बनसोडे, स्वाती बारहाते यांनी परिश्रम घेऊन सहल यशस्वी करण्यासाठी सहभाग घेतला.

# महसूल मंत्री बावनकुळेच्या धडाकेबाज निर्णयाने "एनए" अट जाचक प्रक्रियेतून जनतेला मोठा दिलासा - शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**

बीड प्रतिनिधी :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील युती सरकार व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या धडाकेबाज निर्णय प्रक्रियेमुळे जमीन धारकांसाठी एन ए परवानगीची अट जाचक प्रक्रियेतून जनतेला मोठा दिलासा मिळालेला आहे. ही जमीन धारकांसाठी आनंदाची बातमी असल्याचे मत भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला असून, बांधकामासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांकडे चकरा मारण्याची गरज नाही. सातबारा उताऱ्यावर आता आपोआप नोंद होणार आणि वार्षिक अकृषी करही रद्द झाला आहे. महायुती सरकारचा सर्वसामान्यांना हा मोठा दिलासा आहे. राज्य सरकार अनेक जाचक कायदे आणि कायदेशीर नियमांचे अडथळे दूर करत आहे. गेल्या वर्षी सुद्धा ना. बावनकुळे यांच्या महसूल खात्याने जाचक अटी आणि शर्थी इतिहासजमा केल्या. जमीन महसूल कायद्यात मोठा बदल करण्यात आला आहे. निवासी, वाणिज्य कारणांसाठी करण्यात येणार्या बांधकामाकरिता आवश्यक जामनीच्या 'एनए'



म्हणजेच अकृषक परवानगीची अटच आता रद्द करण्यात आली आहे.

मंगळवारी राज्य शासनाने याविषयीचा शासन आदेश जारी केला. यापूर्वी राज्यात बांधकामासाठी जमीन अकृषक परवानगी असणे आवश्यक होते. जिल्हाधिकाऱ्यांकडून अकृषक कर भरून जमीन बिनशेती करून घेणे आवश्यक होते. एनए परवानगी असल्याशिवाय बांधकाम परवानगी मिळत नव्हती. राज्यातील अकृषक वापर असलेल्या जमिनीवर महसूल विभागाकडून दरवर्षी अकृषक कर आकारला जात होता. तर स्थानिक संस्था नगरपालिका ग्रामपंचायती त्यावर मालमत्ता करही आकार होत्या. या दुहेरी कर पद्धतीला राज्यात अनेक वर्षांपासून विरोध होता. तो लक्षात घेत राज्य सरकारने एनएची अट रद्द केली आहे.

नागरिकांना यापुढे बांधकामांसाठी संबंधित नगररचना विभागाला अथवा स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज सादर करावा लागणार आहे. या कार्यालयाकडून एकवेळ अकृषक शुल्क भरून घेतल्या जाईल आणि ले-आऊटला मंजुरी दिली जाणार आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांकडून अकृषक परवानगीसाठी स्वतंत्र परवानगीची गरज नाही. या निर्णयाने राज्यातील शेकडो गृहनिर्माण संस्थांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. परवानगीसाठी अर्जफाटे प्रक्रिया बंद होणार आहे. विद्यार्थ्यांनाही विविध प्रमाणपत्र काढण्यामध्ये मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे राज्य सरकार व ना. बावनकुळे यांचे स्वागत केले जात आहे.